

वाचनालय, ठाणे
बाँ वा:
१४९८९

१४९८९

IRBK-0114989





म. द. वैद्य

# वहान आणि भूक यांच्या कथा

## कथामंजरी

म. द. वैद्य

IRBK-0114989

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., मुंबई २

तहान आणि भूक या माणसाच्या दोन प्राथमिक गरजा
त्यासंबंधीच्या या साऱ्या जगातल्या विविध सत्यकथा

कुमार साहित्य माला

श्री : ७१० [ १–७३ ]

© १९७३
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

आवृत्ती पहिली :
शके १८९४, सन १९७३

मूल्य रु. ३–००

कथासंग्रह

कुमार साहित्यमाला
पुस्तक २२४ वे

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.करिता
३, राउंड बिल्डिंग
मुंबई २

मुद्रक :
ज. श्री. टिळक
केसरी मुद्रणालय
५६८ नारायण पेठ
पुणे ३०

१४९८९

कथामंजिरी

# दोन घोट – दोन घास

ग्रीक पुराणातील देव फार रागीट होते. अपराध्यांना ते दयामाया न दाखविता अतिशय कडक शिक्षा करीत असत. प्रॉमिथियसने देवांचा अग्नी चोरला म्हणून त्यांनी त्यास कॉकेशस् पर्वतावरील एका खडकावर साखळदंडाने जखडून टाकले. प्रतिदिनी एक गरुड तेथे येऊन त्याचे काळीज कुरतडून टाकी व प्रतिरात्री त्यास नवे काळीज फुटे. टँटॅलस हा तर खुद्द ज्युपिटरचा ( देवांचा राजा ) मुलगा. त्याने अमृत चोरले. पण हा आपल्या राजाचा पुत्र म्हणून देवांनी काही त्याची गय केली नाही. त्यांनी त्याला एका तळ्यात बांधून ठेविले. त्याला भूक लागली की तळ्याकाठच्या झाडांच्या फळांनी लगडलेल्या फांद्या त्याच्या जवळ जवळ येऊ लागत; पण तो त्यास हात लावू लागला की त्या भराभर मागे सरकत. त्याला तहान लागली की पाणी भरभर वर सरकू लागे; पण ते त्याच्या हनुवटीपर्यंत आले की पुनः भर्कन ओसरून जाई. एखाद्या अपराध्याला जर कोणी विचारले, " तुला कोणासारखी शिक्षा

एका खेड्यात त्या पहाटे घडलेला प्रसंग गोडसे भटजींच्याच शब्दांत वाचलेला बरा :

" ... झुंजूमुंजूचे सुमारास आम्ही एका विहिरीजवळ होतों. तों पांच-चार घोडेस्वार जात होते. त्यांत झाशीवाली दृष्टीस पडली ... सर्व अंग धुळीनें भरलें होतें. तोंड किंचित् आरक्त असून म्लान व उदास दिसत होतें. तिला तृषा फार लागली होती. आम्हीं पुढें होऊन विनंती केली, "आम्ही पाणी काढून देतों." बाईसाहेबांस ओळख पटली. त्या खालीं उतरल्या. मी रस्सी-मडकें घेऊन लागलीच विहिरींत सोडणार तों बाईसाहेब म्हणाल्या, " आपण विद्वान्. मजकरता पाणी काढू नका. " मला फार वाईट वाटले ... रस्सी-मडके खाली ठेवले. बाईसाहेबांनी पाणी काढून त्या मृण्मय पात्रांतून ओंजळीनें पाणी पिऊन तृषा हरण केली."

बोअर लोकांचे कैदेतून निसटलेल्या चर्चिलने रातोरात एका मालगाडीतून चोरून प्रवास करून बरेच अंतर काटले व उत्तररात्री एका निर्मनुष्य ठिकाणी चालत्या गाडीतून उडी घेतली. त्यावेळचे वर्णन करताना तो म्हणतो : "I looked at the stars. The Orion shone brightly. Scarcely a year before he had guided me when lost in the desert, guided me ro the banks of the Nile. He had given me water. Now he shoud lead to freedom. I could not endure the want of either." (—मी नक्षत्रांकडे पाहिले. ओरायन नक्षत्र दिमाखाने चमकत होते. मी वाळवंटात चुकलो असता मला मार्गदर्शन करून त्या नक्षत्राने नाईलचा किनारा गाठण्यास मदत केली होती. त्यावेळी त्याने मला पाणी दिले होते. आता मी स्वतंत्र राहाणेही त्याच्याच मार्गदर्शनावर अवलंबून होते. पाणी आणि स्वातंत्र्य ... दोहोंपैकी कोणत्याही एका गोष्टीवाचून मला तग धरता येणार नव्हती.)

आणि विश्वामित्र ... त्याने तर महादुष्काळात मेलेल्या कुत्र्याच्या एका तंगडीला आपल्या उदरात उदाराश्रय देऊन ' आधी जगणे महत्त्वाचे ... ' हा महामंत्रच दिला नाही काय ?

आज आपणही दुष्काळाच्या भीषण छायेत वावरत आहोत. कष्टांची पराकाष्ठा करून त्यावर मात करायचा प्रयत्न करीत आहोत. त्याला यश आल्यावाचून राहणार नाहीच. तरी सुद्धा एकाद्या क्षणी आपला प्रयत्नांवरचाच विश्वास उडण्याची शक्यता निर्माण होणार नाही, असे नाही. त्या वेळी विहिरीत पडलेल्या त्रिताने ज्याप्रमाणे अनेक देवतांची नावे घेऊन " वित्तं मे अस्य रोदसी । " ( या माझ्या प्रार्थनेकडे लक्ष द्या. ) असा टाहो फोडला, तसा टाहो फोडून, जाणारा तोल सावरला पाहिजे.

— म. द. वैद्य

तहानेच्या कथा :


| | | |
|---|---|---|
| १. | उंटोबाची हटकण भोवली | १ |
| २. | अश्विनीकुमारांची आठवण | ३ |
| ३. | मी मोलाचा नारळ गमावला | ४ |
| ४. | मरणाहून भयंकर शिक्षा | ७ |
| ५. | येरे येरे पावसा ! | ९ |
| ६. | मला नको पखालीतले पाणी | १० |
| ७. | नको आपल्याला पाणपोईचे पाणी | १३ |
| ८. | मला नको असले पाणी | १५ |
| ९. | माझ्या शिपायांना झोटच येईल ! | १६ |
| १०. | नेपोलियन बादशहाचा विजय असो ! | १८ |
| ११. | धोतराचे भाग्य | २० |
| १२. | शेवटचा प्रश्न | २२ |
| १३. | देवा ! मला निपुत्रिक कर ! | २४ |
| १४. | सर्वांभूती एकच आत्मा | २५ |
| १५. | मी जागचा हललो नाही | २८ |
| १६. | शाप की वरदान ? | ३० |
| १७. | माझ्या काळजात कसेसेच झाले | ३२ |
| १८. | प्रेमाने रागावर मात केली | ३५ |
| १९. | मी पाण्याचा प्याला फेकून दिला | ३६ |
| २०. | एवढी दगदग कोण करतो ! | ३८ |
| २१. | चतुर सेवक | ३९ |
| २२. | मुली, तू शूर आहेस ! | ४१ |
| २३. | अभिनव म्हणजे सत्य नव्हे | ४२ |
| २४. | तहानेपुढे परीक्षाही तुच्छ | ४४ |
| २५. | केल्याने होत आहे रे ! | ४६ |

भूकेच्या कथा :


१. अगा जे झालेचि नाही ४९
२. दाण्या-दाण्यावर लिहिले आहे ५२
३. मोहरा गमावला पण भोजन नाही गमावले ! ५३
४. तेचि पुरुष भाग्याचे ५४
५. डॅझिंग चॉकोलेट ५६
६. बोलाचाच पुलाव ! ५७
७. अन्न हेच परब्रह्म ५९
८. मनुष्य केवळ भाकरीवर जगत नसतो ६०
९. प्रेम लाभे प्रेमळाला ६२
१०. अखंड उपवासी ६६
११. तेचि श्वान भाग्याचे ६७
१२. अमृतासमान भाकर ६९
१३. अमृतस्वामिगौरवम् ७०
१४. कुत्र्याचा हेवा वाटला ! ७२
१५. आपद्धर्म ७३
१६. भूक न म्हणे हा भूपती ७४
१७. मी भाकरी चोरल्या नाहीत ७५
१८. अन्नाचा साठा केवळ सव्वा मैलावर ७६
१९. श्राद्ध : विकतचे आणि फुकटचे ७७
२०. प्रतिशोध म्हणजे देवांचा आनंद ७९
२१. आपुले मरण पाहिले म्या डोळा ८२
२२. आणखी भाकरी ८४
२३. आम्ही वाचलो सात ८७
२४. दसऱ्याचे भोजन पदरात पडले ८८
२५. मला सात भाचरे आहेत ९०
२६. जलपान ? छे अमृतपान ! ९२
२७. मला न्याय मिळाला ९५
२८. मी पहाऱ्यावर आहे ९७
२९. गीत कुणाचे व्यथा कुणाला ९९

# १. उंटोबाची हटकण भोवली

कोणत्याही चांगल्या गोष्टीचा आरंभ करताना आपण श्रीगजाननाचे स्मरण करतो. गजराज आणि श्रीगजानन यांचे नाते सुप्रसिद्धच आहे. म्हणून तहान-कथांची सुरुवात एका गजराजाच्या तहानकथेने केल्यास ते वरील परंपरेला धरूनच होईल.

भली पहाट झाली. म्हटले, " सरोवरावर जाऊ ... थोडं पाणी पिऊ ... थोडीशी जलक्रीडा पण करू. मग परत येऊ. "

निघालो. वाटेत भेटले उंटोबा. मान लांबवीत ते म्हणाले, " गजेंद्रदादा ! गजेंद्रदादा ! कुठं निघालात लगबगीनं ? " आता एवढे वयाने वाढलेले उंटोबा, समजू नये का त्यांना की, " कोठे जाता ? " अशी हटकण घालू नये. काम बिघडते. असा राग आला मला त्यांचा ! वाटले, उंच करावी सोंड आणि द्यावा झालं एक फटकारा ठेवून ! पण पुनः विचार केला, आपल्यापेक्षा दुबळे असतील त्यांच्यावर कधी हल्ला करू नये. शूराचे ते काम नव्हे. सुभाषित आठवले. थोडे हसून मी उंटोबांना म्हटले, " उंटोबा, तहान लागलीय. पाणी प्यायला जातोय. आम्हांला कुठे दिलीय देवाने तुमच्यासारखी मदार पाणी साठवायला ? बरं, आता येतो, रामराम ! " उंटोबा काय म्हणतात ते पाहायला थांबलोच नाही मी.

सरोवरापाशी आलो आणि बेधडक पाण्यात घुसलो. ' ओय्-ओय् ! ' माझा पाय धरलान की, पाण्यात दडून बसलेल्या मगराने. आम्ही हत्ती बलवान खरे पण फक्त जमिनीवरच ! पाण्यात जोर मगराचा. खूप धडपड केली सुटण्यासाठी. पण व्यर्थ ! मी अधिक अधिक खोलात

ओढला जाऊ लागलो. अखेर शेवटी भगवंतांचा धावा सुरू केला. ते आलेच लगोलग गरुडावर बसून. त्यांनी आपल्या हातातले चक्र गरगर फिरवले आणि सोडले त्या दुष्ट मगरावर. मगर क्षणार्धात गतप्राण झाला. मी त्या सरोवरातलेच एक कमळ उपटले व ते भगवंतांच्या चरणांवर वाहिले.

आता हे सारे सांगायला मजा वाटते; पण मगरमिठी पायांना बसली तेव्हा पाहायचे होतेत! अगदी रडकुंडीलाच आलो होतो मी.



# २. अश्विनीकुमारांची आठवण

वरच्या कथेतील दुष्ट मगराचा कोणालाही रागच येईल. पण अनेकदा माणसांमध्येही दुष्ट लोक आढळतात. फरक एवढाच की अशी दुष्ट माणसे अनेकदा चटकन ओळखता येत नाहीत. प्रसंग येताच मात्र ते आपला खरा स्वभाव उघड करतात. जगातील आद्य साहित्य म्हणून वेदांचा गौरव करण्यात येतो. त्या वेदांमधील ही एक कथा.

माझे नाव त्रित्. मी आणि माझे एत् व द्वित् या नावांचे दोन मित्र बरोबर बरीच संपत्ती घेऊन एका गहन अरण्यातून चाललो होतो. वाटेत आम्हांला तहानेने व्याकूळ केले. बऱ्याच शोधाअंती आम्हांला एक कूप ( विहीर ) आढळला. मी माझ्याजवळचा ऐवज काठावर ठेवून विहिरीत उतरलो. प्रथम माझ्या मित्रांना पाणी दिले व नंतर मी पाण्याचे भांडे तोंडाला लावले. तोच एकाएकी माझ्या डोळ्यांसमोर अंधार झाला. मला समजेनाच काही वेळ काय झाले ते. मी मित्रांना हाका मारू लागलो. पण उत्तरादाखल त्यांचे विकट हास्य मात्र ऐकू आले. माझ्याजवळील धनाच्या लोभाने त्यांनी विहिरीच्या तोंडावर एका मोडक्या गाडीचे चाक ठेवून ते बंद केले होते. ‘ आता पोटभर पाणी पी ! ’ असे कुत्सितपणे म्हणत ते दोघेजण निघून गेले.

पुढे काय करावे हे मला सुचेनाच काही काळ. पण नंतर अश्विनीकुमारांची आठवण झाली. मागे गौतम एका खोल खड्ड्यात पडून तहानेने व्याकूळ झाला असता त्याने अश्विनीकुमारांचा धावा केला होता. त्या वेळी त्या दोघांनी त्याच्याजवळ एक विहीर नेऊन विहिरीचे तोंड खाली व तळ वर करून त्याची तहान भागवली होती. मला ती गोष्ट आठवली मग मी त्यांचाच धावा करायला सुरुवात केली.

■ ■

ओढला जाऊ लागलो. अखेर शेवटी भगवंतांचा धावा सुरू केला. ते आलेच लगोलग गरुडावर बसून. त्यांनी आपल्या हातातले शस्त्र गरगर फिरवले आणि सोडले त्या दुष्ट मगरावर. मगर क्षणार्धात गतप्राण झाला. मी त्या सरोवरातलेच एक कमळ उपटले व ते भगवंतांच्या चरणांवर वाहिले.

आता हे सारे सांगायला मजा वाटते; पण मगरमिठी पायांना बसली तेव्हा पाहायचे होतेत ! अगदी रडकुंडीलाच आलो होतो मी.



# २. अश्विनीकुमारांची आठवण

---

वरच्या कथेतील दुष्ट मगराचा कोणालाही रागच येईल. पण अनेकदा माणसांमध्येही दुष्ट लोक आढळतात. फरक एवढाच की अशी दुष्ट माणसे अनेकदा चटकन ओळखता येत नाहीत. प्रसंग येताच मात्र ते आपला खरा स्वभाव उघड करतात. जगातील आद्य साहित्य म्हणून वेदांचा गौरव करण्यात येतो. त्या वेदांमधील ही एक कथा.

---

माझे नाव त्रित्. मी आणि माझे एत् व द्वित् या नावांचे दोन मित्र बरोबर बरीच संपत्ती घेऊन एका गहन अरण्यातून चाललो होतो. वाटेत आम्हांला तहानेने व्याकूळ केले. बऱ्याच शोधाअंती आम्हांला एक कूप ( विहीर ) आढळला. मी माझ्याजवळचा ऐवज काठावर ठेवून विहिरीत उतरलो. प्रथम माझ्या मित्रांना पाणी दिले व नंतर मी पाण्याचे भांडे तोंडाला लावले. तोच एकाएकी माझ्या डोळ्यांसमोर अंधार झाला. मला समजेनाच काही वेळ काय झाले ते. मी मित्रांना हाका मारू लागलो. पण उत्तरादाखल त्यांचे विकट हास्य मात्र ऐकू आले. माझ्याजवळील धनाच्या लोभाने त्यांनी विहिरीच्या तोंडावर एका मोडक्या गाडीचे चाक ठेवून ते बंद केले होते. ‘ आता पोटभर पाणी पी ! ’ असे कुत्सितपणे म्हणत ते दोघेजण निघून गेले.

पुढे काय करावे हे मला सुचेनाच काही काळ. पण नंतर अश्विनीकुमारांची आठवण झाली. मागे गौतम एका खोल खड्ड्यात पडून तहानेने व्याकूळ झाला असता त्याने अश्विनीकुमारांचा धावा केला होता. त्या वेळी त्या दोघांनी त्याच्याजवळ एक विहीर नेऊन विहिरीचे तोंड खाली व तळ वर करून त्याची तहान भागवली होती. मला ती गोष्ट आठवली मग मी त्यांचाच धावा करायला सुरुवात केली.

■ ■

# ३. मी मोलाचा नारळ गमावला

संकटप्रसंगी गजेंद्राने आणि त्रिताने देवांचा धावा करून आपली मुक्तता करून घेतली. पण जर एखाद्यावर देवाचाच कोप झाला तर ? तर मात्र त्याची धडगत नसते. आदित्यराणूबाईच्या कहाणीतील राजाच्या राणीचीच गोष्ट पाहा ना ! तिच्यावर झाला सूर्यनारायणाचा कोप. तिचा पती देशोधडी लागला. तिच्यावर बहिणीकडे याचना करायची वेळ आली. एका रविवारी तिने आपल्या थोरल्या मुलाला बहिणीकडे धाडले. बहिणीने भाच्याला पोखरलेल्या कोहळ्यात मोहोरा भरून दिल्या. सूर्यनारायण त्या मुलाला माळ्याच्या रूपाने भेटले व कोहळा हिसकावून घेऊन निघून गेले. दुसऱ्या रविवारी आपल्या घरी आलेल्या भाच्याला राणीच्या बहिणीने काठी पोखरून तिच्यात मोहोरा भरून दिल्या. सूर्यनारायण गुराख्याच्या रूपाने आले. हातची काठी घेऊन गेले. तिसऱ्या रविवारी काय घडले ? ते राणीच्या आठ वर्षांच्या तिसऱ्या मुलाच्या तोंडून ऐकणे बरे.

---

आईने मला भल्या पहाटेच उठवले व म्हटले, "बाळ ! तू आपल्या मावशीकडे जा. ती देईल ते घेऊन ये."

मी घाबरलो. गेल्याच्या गेल्या रविवारी माझा सर्वांत मोठा भाऊ मावशीकडे गेला होता. मावशीने त्याचा खूप पाहुणचार केला. कोहळा पोखरला. त्यात सोन्याच्या मोहोरा भरल्या. कोहळा भावाजवळ दिला. म्हटले, "कोहळा घरी जपून ने." भाऊ घरी येऊ लागला. एक माळी वाटेत भेटला. भावाला दम भरून त्याने कोहळा काढून घेतला. भाऊ रडत रडत घरी आला.

आई म्हणाली, "नशीब माझे! मी सूर्यनारायणाची कहाणी ऐकली नाही, तिचे हे फळ. माझे पती देशांतरास गेले. आपणा सर्वांचे राज्य गेले. दारिद्र्य आले. सूर्यनारायणांनीच माळ्याचा वेष घेतला असला पाहिजे."

दुसऱ्या रविवारी गेलेल्या दुसऱ्या भावाला मावशीने पोखरलेल्या काठीत द्रव्य भरून दिले. भाऊ घरी येऊ लागला. वाटेत त्यास एक गुराखी भेटला. दम भरून काठी घेऊन गेला.

आता आई मला मावशीकडे धाडीत आहे. मी मोठ्या कष्टाने मावशीच्या गावी गेलो. तळ्याच्या काठी असलेल्या दासींना विचारले, "अग अग दासींनो! तुम्ही दासी कोणाच्या?" त्या म्हणाल्या, "आम्ही दासी प्रधानाच्या." मी म्हटले, "प्रधानाच्या राणीला जाऊन सांगा – तुझा भाचा आला आहे." दासी गेल्या.

मावशीने मला घरी नेले. माझा चांगला पाहुणचार केला. एक नारळ पोखरला. त्यात मोहोरा भरल्या. नारळ देऊन ती म्हणाली, "बाळ! नारळ जपून घरी ने." मावशीच्या पाया पडून मी निघालो.

मनात एकच धास्ती होती – सूर्यनारायण कोणत्या तरी वेषाने येतील. हातचा नारळ काढून नेतील.

चालता चालता मला लागली तहान. समोरून एक माणूस येत होता. त्याला विचारले. तो मला म्हणाला, "मला नाही ठाऊक विहीर कोठे आहे ते." दुसरा माणूस खदखदा हसून म्हणाला, "पोरा! तहान लागलीय् ना मग हातातला नारळ फोड. त्यातले पाणी पी. मला खोबरे दे." मी तेथून धूमच ठोकली. अखेरीस एका सज्जन माणसाने मला विहीर दाखविली.

विहीर पाहताच मला हर्ष झाला. मी घाईघाईने तो नारळ विहिरीच्या काठावर ठेवला व विहिरीच्या पायऱ्या उतरू लागलो. तोच



धप्प असा आवाज झाला. नीट टेकण न लावल्याने नारळ गडगडून विहिरीत पडला होता. मला खूप वाईट वाटले. पाणी प्यालो. मार्गाला लागलो. घरी येऊन आईला घडलेली हकीगत सांगितली.

थोरला भाऊ म्हणाला, " काय म्हणावे तुला ? नारळ विहिरीच्या काठावर ठेवताना कोणी नारळ चोरून नेईल अशी शंका कशी आली नाही तुला ? "

दुसरा भाऊ म्हणाला, " नारळ काठापासून जरा दूर ठेवायला हवा होतास. "

मी त्यांना एकच उत्तर दिले, " तुम्ही तहानेने व्याकूळ होऊन हिंडत असताना जर तुम्हांला विहीर दिसली असती तर तुम्हीही मी

केले तसेच वर्तन केले असते. तहानेल्या माणसाला जर कोणी म्हटले – कुबेराची संपत्ती आणि घोटभर पाणी यांतून एकाची निवड कर – तर तो कुबेराच्या संपत्तीकडे पाठ फिरवून घोटभर पाणीच घेईल."

आईला खूपच दुःख झाले. पण ती म्हणाली, "खरे आहे याचे म्हणणे. तृषार्ताची व्यथा तृषार्तालाच समजायची."

■ ■

## ४. मरणाहून भयंकर शिक्षा

---

आदित्यराणूबाईच्या कहाणीतल्या राणीवर संकटे आली खरी पण अखेरीस तिने केलेल्या व्रतामुळे सूर्यनारायण राग विसरून तिच्यावर प्रसन्न झाले व तिला सुखाचे दिवस आले. पण आता जी कथा सांगणार आहे, तिच्या नायकाच्या नशिबी मात्र दुःखच दुःख आहे. या नायकाचे नाव आहे टँटॉन्स. ग्रीक पुराणात देवांच्या राजाला ज्युपिटर म्हणतात. टँटॉन्स हा ज्युपिटरचा मुलगा. टँटॉन्सने एकदा देवांची काही महत्त्वाची गुपिते फोडली. देव रागावले. त्यांनी टँटॉन्सला पकडले ... तेव्हा काय झाले?

---

देवांनी मला धरले. ते म्हणाले, "आम्ही तुला अगदी भयंकर शिक्षा करणार आहोत. तू आमची गुपिते फोडलीस हा तुझा महाभयंकर अपराध आहे."

मी खदखदा हसलो व म्हणालो, "मला शिक्षा तरी काय करणार रे तुम्ही? एखाद्या माणसाने गंभीर गुन्हा केला तर त्याला ठार




धप्प असा आवाज झाला. नीट टेकण न लावल्याने नारळ गडगडून विहिरीत पडला होता. मला खूप वाईट वाटले. पाणी प्यालो. मार्गाला लागलो. घरी येऊन आईला घडलेली हकीगत सांगितली.

थोरला भाऊ म्हणाला, " काय म्हणावे तुला ? नारळ विहिरीच्या काठावर ठेवताना कोणी नारळ चोरून नेईल अशी शंका कशी आली नाही तुला ? "

दुसरा भाऊ म्हणाला, " नारळ काठापासून जरा दूर ठेवायला हवा होतास. "

मी त्यांना एकच उत्तर दिले, " तुम्ही तहानेने व्याकूळ होऊन हिंडत असताना जर तुम्हांला विहीर दिसली असती तर तुम्हीही मी

केले तसेच वर्तन केले असते. तहानेल्या माणसाला जर कोणी म्हटले – कुबेराची संपत्ती आणि घोटभर पाणी यांतून एकाची निवड कर – तर तो कुबेराच्या संपत्तीकडे पाठ फिरवून घोटभर पाणीच घेईल."

आईला खूपच दुःख झाले. पण ती म्हणाली, "खरे आहे याचे म्हणणे. तृषार्तांची व्यथा तृषार्तालाच समजायची."

■ ■

# ४. मरणाहून भयंकर शिक्षा

---

आदित्यराणूबाईच्या कहाणीतल्या राणीवर संकटे आली खरी पण अखेरीस तिने केलेल्या व्रतामुळे सूर्यनारायण राग विसरून तिच्यावर प्रसन्न झाले व तिला सुखाचे दिवस आले. पण आता जी कथा सांगणार आहे, तिच्या नायकाच्या नशिबी मात्र दुःखच दुःख आहे. या नायकाचे नाव आहे टँटॉन्स. ग्रीक पुराणात देवांच्या राजाला ज्युपिटर म्हणतात. टँटॉन्स हा ज्युपिटरचा मुलगा. टँटॉन्सने एकदा देवांची काही महत्त्वाची गुपिते फोडली. देव रागावले. त्यांनी टँटॉन्सला पकडले ... तेव्हा काय झाले?

---

देवांनी मला धरले. ते म्हणाले, "आम्ही तुला अगदी भयंकर शिक्षा करणार आहोत. तू आमची गुपिते फोडलीस हा तुझा महाभयंकर अपराध आहे."

मी खदखदा हसलो व म्हणालो, "मला शिक्षा तरी काय करणार रे तुम्ही? एखाद्या माणसाने गंभीर गुन्हा केला तर त्याला ठार

मारतात. पण मी तर तुमच्याप्रमाणेच अमृत प्यालो आहे. मी अमर आहे. मला कसे ठार कराल ? ”

देव कुत्सितपणे हसत उत्तरले, “ मरण बरे अशी शिक्षा आम्ही तुला करणार आहोत ! ”

मग मला त्यांनी एका तळ्यात उभे करून बांधून टाकले. पाणी माझ्या छातीपर्यंत होते. तळ्याच्या काठी फळांची खूप झाडे होती. मी नुसता हात लांबवायचा अवकाश मला हवी तेवढी फळे खाता आली ‘असती. मी ओंजळीने पाणी पिऊ शकलो असतो. मी देवांना म्हटले, ‘ हीच का रे तुमची भयंकरातली भयंकर शिक्षा ? अरे ही शिक्षा का शिक्षेची चेष्टा ? ”

हसता हसता मला लागली तहान. आपण पाणी प्यावे असा विचार मनात आला मात्र ... पाणी हळूहळू वर चढू लागले. मी म्हटले “ वाहवा ! ही तर मोठीच मजा आहे ! ”

पाणी गळ्यापर्यंत आले. हनुवटीपर्यंत आले. पुढच्याच क्षणी ते माझ्या तोंडात गेले असते. पण काय झाले कोणास ठाऊक ? पाणी एकदम ओसरले. ओंजळीत घेतलेले पाणीही एकदम गळून पडायचे.

फळे खावीशी वाटू लागली. झाडाच्या फांद्या आपोआप माझ्या-जवळ आल्या. फळ तोडण्यासाठी मी हात लांबवताच मात्र त्या माझ्यापासून दूर दूर पळाल्या.

पाणी ओठापर्यंत यायचे नि ओसरायचे. झाडाच्या फांद्या जवळ यायच्या नि अकस्मात दूर जायच्या. असा खेळ आजपर्यंत चालू आहे. मी रडतो. देव कुचेष्टेने हसतात !

■ ■

# ५. येरे येरे पावसा !

---

टँटॉन्सला देवांनी दारुण शिक्षा दिली खरी ... पण टँटॉन्सचा अपराधही त्यांच्या मते भयंकर होता. पण काही काही जणांना विना-कारणच शिक्षा झालेली आहे, असेही अनेकदा आढळून येते. आणि आपणांला हळहळ वाटू लागते. संस्कृत वाङ्मयात वारंवार आढळणारा चातकपक्षी सत्यसृष्टीत अस्तित्वात नाही हे खरे. पण चातकपक्षी ज्यांचे प्रतीक होऊ शकेल असे दुर्दैवी जीव आपण थोडी दृष्टी इकडे तिकडे टाकली तर आढळल्यावाचून राहणार नाहीत हे मात्र निश्चित.

---

मी चोचीने अंड्याचे कवच फोडले आणि या जगात प्रवेश केला. पिवळे पिवळे ऊन सर्वत्र पसरले होते. जवळच माझी आई होती. तिने मोठ्या आनंदाने माझ्या चोचीत चारा घातला. मी तो चारा मन लावून खाल्ला. नंतर लागली मला तहान. आमचे घरटे ज्या झाडावर होते त्याच्याजवळच एक नदी होती. बरेच पक्षी तेथे पाणी पीत होते. मी आईला म्हटले, "आई, मला तहान लागली आहे. मला तुझ्या पाठीवर बसव. नदीपर्यंत घेऊन चल."

आई म्हणाली, "बाळ तुला ते जमायचे नाही."

पण मी हट्टच धरला. तेव्हा ती मला घेऊन नदीपाशी गेली. मी चोच पाण्यात बुडवली व पाणी पिऊ लागलो. चोचीने मी पाणी ओढीत होतो खरे, पण पोटात कोठे जात होते पाणी ? माझ्या घशाला होते भोक. चोचीने ओढलेले पाणी त्या छिद्रातून बाहेर पडत होते. मी रडू लागलो.

आई म्हणाली, "बाळ ! आपण चातक पक्षी आहोत. आपणांस

इतरांप्रमाणे मान खाली करून पाणी पिता येत नाही. आकाशातील ढगांतून पडणारे पाणीच फक्त आपणांस पिता येते."

मी मुकाट्याने घरट्यात परतलो. काही दिवसांनी पावसाळा आला. मेघ दाटून आले. मोर नाचू लागले. बेडूक ओरडू लागले. विजा कडाडू लागल्या. आणि बघता बघता पाऊस पडू लागला. आई मला म्हणाली, "माझ्या पिला! आकाशाकडे बघून चोच उघड."

मी तसे केले. पावसाचे थेंब सरळ माझ्या पोटात जाऊ लागले. मला खूप आनंद वाटला. काही मुले टाळ्या पिटत म्हणत होती —

"येरे येरे पावसा!"

मीही म्हणू लागलो, "येरे येरे पावसा!"

■ ■

## ६. मला नको पखालीतले पाणी

---

आपण ज्या भागात राहतो, त्या भागात त्या मानाने पाऊस समाधानकारक पडतो; येरे येरे पावसा असे गाणे म्हटले नाही तरी. पण काही भाग असे आहेत की, तेथे एखाद्या गंधर्वाने जरी मेघमल्हार राग आळवला तरी ढग यायची मारामार. मारवाड हा प्रांत असाच विनापावसाचा प्रदेश. अशा या मरुभूमीत चुकूनमाकून येणाऱ्या मेघांना म्हणतात 'उत्तंक' मेघ. हे नाव का पडले ते पुढील कथेवरून समजेल.

---

माझा आश्रम मरुभूमीत. एके दिवशी माझ्या दाराशी श्रीकृष्णाचा रथ थांबला. त्याने मला म्हटले, "उत्तंकमुने! प्रणाम. पांडवांचा

वनवास व अज्ञातवास संपला आहे. त्यांच्या सांगण्यावरून मी कौरवां कडे शिष्टाईला निघालो आहे."

मी म्हटले, "कृष्णा! तुझी शिष्टाई यशस्वी होऊ दे."

कृष्ण निघून गेला. खूप दिवस लोटले. पुन्हा एके दिवशी श्रीकृष्ण परत माझ्या आश्रमात आला. मी आनंदाने म्हटले, "कृष्णा! झाली ना तुझी शिष्टाई सफल?" पण कृष्णाने सांगितले भलतेच! शिष्टाई



मोडली होती. पुढे कौरव-पांडवांचे भीषण युद्ध झाले. अठरा अक्षौहिणी-तून पाच पांडव, कृष्ण, सात्यकी अश्वत्थामा, कृप आणि कृतवर्मा इतकेच लोक वाचले.

मला श्रीकृष्णाचा राग आला. मी म्हटले, "कृष्णा! तू मनावर घेतले असतेस तर हे युद्ध टळले असते."

श्रीकृष्णाने माझी समजूत काढली. कृष्ण द्वारकेला जायला निघाला. जाता जाता मला विचारले. "मी आपले काय प्रिय करू?"

मी म्हटले, " मला अमृत प्यावेसे वाटते. "

श्रीकृष्ण म्हणाला, " ठीक आहे. मी इंद्राला सांगतो. "

श्रीकृष्ण निघून गेला.

मग एके दिवशी वाळवंटात हिंडत असता मला तहान लागली. पाणी कोठे आढळेना. काही वेळाने क्रूर दिसणारा, खांद्यावर पखाल घेतलेला एक माणूस माझ्यासमोर आला व म्हणू लागला, " तुला तहान लागली आहे वाटते ? हे घे पखालीतले पाणी ! "

मला तहान लागली होती; खरी पण कातड्याच्या पखालीतले पाणी पिण्याची कल्पनाच मला भयंकर वाटली. मी तिटकाऱ्याने म्हटले, " नको रे बाबा, मला तुझ्याजवळचे घाणेरडे पाणी ! "

तत्क्षणीच तो भयंकर माणूस नाहीसा झाला व त्याच्या जागी हातात अमृताचा कुंभ घेतलेला इंद्र प्रकट झाला. तो खिन्न दिसत होता. तो मला म्हणाला, " उत्तंका ! श्रीकृष्णाने मला आज्ञा केली होती की, उत्तंकाला अमृत नेऊन दे. मला मोठा प्रश्न पडला. मी देवांचा राजा असलो तरी स्वर्गाचे नियम मलाही मोडता येत नाहीत. केवळ देवांनाच लाभणारे अमृत मानवांना देता येत नाही. कृष्णाचा शब्दही मला मोडता येईना. म्हणून तुला तहान लागल्याची संधी साधून मी वेगळ्या वेषाने येथे आलो होतो. उद्या जर मला कोणी विचारले असते की, ' तू नियम का मोडलास ? ' तर मी म्हटले असते, ' उत्तंक तहानेने व्याकूळ झाला होता. मला त्याची दया आली म्हणून मी त्याला अमृत दिले ... पण तू तर नकार दिलास. मी आता तुला अमृत देऊ शकत नाही. "

इंद्र निघून गेला. पुढे मी श्रीकृष्णाला म्हटले, " मला नाही तर नको मिळू दे अमृत. पण तहानेने त्रस्त झालेल्या वाळवंटातलि लोकांसाठी तू तेथे मधून मधून मेघ धाडत जा. "

श्रीकृष्णाने त्या माझ्या मागणीला होकार दिला.

खरे म्हटले तर श्रीकृष्णाच्या कृपेने वाळवंटात येणाऱ्या या मेघांना 'कृष्णकृपा' मेघ असेच नाव द्यायला हवे. पण लोकांनी आपले या मेघांना 'उत्तंक' मेघ असेच नाव ठेवले आहे !

■ ■


# ७. नको आपल्याला पाणपोईचे पाणी

उत्तंक मुनि वयोवृद्ध होते. तपस्वी होते. अर्थातच संयमी होते. निषिद्ध पाणी ते सहजगत्या नाकारू शकले. पण असाच संयम एका बालकानेही दाखवून भर वाळवंटात देऊ केलेले पाणी नाकारले आहे. त्या बालकाचे नाव रोहिदास.

राजा हरिश्चंद्राने स्वप्नात केलेले राज्यदान प्रत्यक्षात केले. सर्वस्वावर पाणी सोडून तो आपली राणी तारामती आणि मुलगा रोहिदास यांच्यासह राज्याबाहेर पडला.

नद्या, टेकड्या, अरण्ये ओलांडीत तो शेवटी एका वाळवंटात येऊन पोचला. तळपता सूर्य नि रखरखीत वाळवंट. तहानेने साऱ्यांचे घसे कोरडे पडलेले. राजा कणखर, राणी सहनशील. ती दोघे सारे सहन करीत होती. पण बाल रोहिदासाचे काय ?

इतक्यात योगायोगाने ती तिघे चालत चालत एका ठिकाणी येऊन पोचली. त्या ठिकाणी होती पाणपोई. आल्या गेल्या तृषार्ताला मोफत पाणी प्यावयास देण्याची सोय तेथे केलेली होती. अनेक प्रवासी



त्या सोयीचा लाभ घेऊन आपली तृषा शांत करीत होते. पाणपोई चालविणाराला मनापासून धन्यवाद देत होते.

रोहिदासाला वाटले एवढी पाण्याची सोय आहे. आता आपण भरपूर पाणी पिऊ. आईवडिलांनाहि पाणी प्यायला मिळेल. त्यांची तहान हरेल.

पण समोर पाणपोई दिसताच राजा हरिश्चंद्र अगदी शांतपणे म्हणाला, " बाळ, आपण दुसऱ्याला द्यायचे असते, घ्यायचे नसते. नको आपल्याला हे पाणपोईचे पाणी. "

आणि रोहिदास वयाने लहान असला तरी हरिश्चंद्र-तारामतीचा मुलगा होता तो. त्याच्या घशाला कोरड पडली होती. तहानेने जीव व्याकूळ झाला होता त्याचा. तरीपण वडिलांचे उद्गार ऐकून तो निमूट-पणे पुढे चालू लागला. त्याने त्या पाणपोईकडे ढुंकून बघितलेसुद्धा नाही.

■ ■

# ८. मला नको असले पाणी !

---

रोहिदासाप्रमाणेच भीष्म हेही महान् पितृभक्त होते. पित्याला सुख लाभावे म्हणून त्यांनी आजन्म ब्रह्मचारी राहण्याची शपथ घेतली. भीष्म हे कौरवांचे पहिले सेनापती. दहा दिवस विलक्षण पराक्रम दाखवून ते घायाळ होऊन युद्धभूमीवर पडले.

---

कौरव-पांडवांचे युद्ध जुंपले. मी झालो कौरवांचा सेनापती. पहिले दहा दिवस मी खूपच पराक्रम केला. दहाव्या दिवशी अर्जुनाच्या बाणांनी घायाळ होऊन मी रथाखाली पडलो. माझ्या सर्वांगावर बाण लागल्याने माझे शरीर जमिनीवर पडलेच नाही; बाणांवरच ते तरंगत राहिले. युद्ध थांबवून सर्वजण माझ्याभोवती जमा झाले. मी म्हटले, " मला लागली आहे तहान, थोडे पाणी आणवा. "

युधिष्ठिराने सोन्याची झारी पुढे केली. दुर्योधनाने हिरे-माणकांनी मढविलेली झारी पुढे केली. मी दोघांचेही हात दूर सारले. म्हटले, " मला नको असले पाणी ! "

युधिष्ठिर म्हणाला, " आजोबा, कोणते पाणी आणू मग ? "

मी म्हटले, " अर्जुनाला बोलवा. त्याला ठाऊक आहे मला कसले पाणी हवे आहे ते. "

अर्जुन होता सर्वांच्यामागे उभा. माझे शब्द ऐकताच तो एकदम पुढे आला. त्याने मला नमस्कार केला; व तात्काळ धनुष्य सज्ज करून त्याने माझ्यापासून तीन हात अंतरावर जमिनीत बाण मारला. जमिनीतून स्फटिकाप्रमाणे निर्मळ असलेल्या पाण्याची धार उडाली ती




नेमकी माझ्या तोंडातच ! अहाहा ! ते पाणी मला किती मधुर लागले म्हणून सांगूं ! मी त्या धनुर्धराला म्हटले, "धन्य, धन्य अर्जुना ! धन्य तुझी ! मला असलेच पाणी हवे होते."

■ ■

## ९. माझ्या शिपायांना झीटच येईल !

---

तहान तर लागली आहे, पाणी तर उपलब्ध आहे ... तरी-सुद्धा काही ना काही कारणास्तव ते पाणी प्राशन करणे उत्तंक मुनी, रोहिदास, भीष्माचार्य ... यांना प्रशस्त वाटलेले नाही. प्रख्यात ग्रीक योद्धा शिकंदर याच्याही आयुष्यात एकदा उपलब्ध झालेले पाणी नाकारायचा प्रसंग उद्भवला होता.

---

मी माझे प्रचंड सैन्य घेऊन जग जिंकायला निघालो. एकदा आम्हांला एक विस्तीर्ण वाळवंट लागले. पहिले काही दिवस आमच्याजवळचे पाणी पुरले. एक दिवस मात्र पाणी संपले. पण वाळवंट मात्र संपले नव्हते. सर्वांचेच कंठ तहानेने सुकले होते. पण तसे कोणी बोलून मात्र दाखवत नव्हते. मधूनच कोणीतरी म्हणे, "शिकंदर महाराज की–" बाकीचे सैनिक म्हणत "जय!" त्या सैनिकांचे



माझ्यावरील हे प्रेम पाहून मला हर्ष होत असे. पण तहानेने व्याकूळ झालेले त्यांचे चेहेरे पाहून मला दुःख होई.

वाटेत आम्हांला तीन-चार भिस्ती आढळले. त्यांच्या पखाली पाण्याने भरलेल्या होत्या. माझ्या एका सरदाराने त्या भिस्त्यांना धरले. त्यांच्याजवळील पाण्याने एक प्याला भरला व त्याने तो माझ्यापुढे केला. मी तो प्याला हातात घेतला. सारे सैन्य माझ्याकडे पाहत होते. मी त्या सरदारास म्हटले, "माझ्या शूर सरदारा! तुझी माझ्यावरची भक्ती मोठी आहे. पण मी जर एकटाच पाणी प्यालो तर काय होईल ठाऊक आहे? इतका वेळ माझ्यामागोमाग आलेले माझे शिपाई झीट येऊन

पडतील. त्यांचा माझ्यावरचा विश्वासच उडून जाईल एकदम. मला नको असले पाणी!" मी हातातला प्याला तसाच जमिनीवर टाकून दिला.

माझ्या शिपायांनी आनंदाने आरोळ्या ठोकल्या. "शिकंदर महाराज की जय!" माझी छाती अभिमानाने भरून आली. मी मनात म्हटले, "माझ्यावर प्रेम करणाऱ्या शिपायांचा विजय असो!"

■ ■

## १०. नेपोलियन बादशहाचा विजय असो !

मागील कथेत आपल्या सैनिकांसाठी पाणी नाकारणारा शिकंदर बादशहा पाहिला. या कथेत आपल्या बादशहाच्या गौरवासाठी पेय नाकारू पाहणारा एक वायाळ सैनिक भेटेल. प्रख्यात फ्रेंच बादशहा नेपोलियन हाही शिकंदराप्रमाणेच आपल्या सैनिकांवर अतोनात प्रेम करीत असे. सैन्य आणि सैनिक हेच त्याचे प्रमुख वेड होते. कोणताही विषय असो हरदासाची कथा मूळपदावर यावी त्याप्रमाणे कोणताही प्रसंग असो ... नेपोलियन आपल्या आवडत्या तत्त्वावर – 'शूरा मी वंदिले' वर येऊन ठेपायचाच.

१८ जून १८१५ ची ही गोष्ट. वॉटर्लू गावाजवळ इंग्रज आणि फ्रेंच यांची लढाई जुंपली. दुपारपर्यंत आमची म्हणजे फ्रेंचांचीच सरशी होती. पण पुढे काय झाले कोणास ठाऊक! आमचे सैन्य एकाएकी माघार घेऊ लागले. मी जखमी होऊन पडलो. तासाभराने मला भयंकर

वेदना होऊ लागल्या. तहानही खूप लागली. मी सारखा ओरडू लागलो, " पाणी ! पाणी ! "



काही वेळाने इंग्रज घोडेस्वारांची एक तुकडी मी होतो त्या ठिकाणी आली. माझा पाण्यासाठी चाललेला आक्रोश ऐकून त्या घोडेस्वारांचा कप्तान घोड्यावरून खाली उतरला व आपल्याजवळील मद्याची बाटली माझ्यापुढे करीत तो म्हणाला, " घे याचे दोन घोट म्हणजे तुझी तहान भागेल. "

मी म्हटले नको.

त्यावर त्याने साहजिकच विचारले, " का ? "

मी उत्तर दिले, " हे मद्य प्याल्यानंतर मला हुशारी वाटेल व माझ्या इतर सैनिक बंधूंप्रमाणे मीही घोषणा देऊ लागेन – 'नेपोलियन बादशहाचा विजय असो ! इंग्रजांचा पराभव होवो !' ... आणि अर्थातच तुम्हांला राग येईल. "

तो कप्तान खिलाड्डू वृत्तीचा होता. तो मला म्हणाला, "तू कोणतीही घोषणा कर. मला त्याचा राग येणार नाही. घे हे मद्य."

मी म्हटले, "असे असेल तर ठीक."

मी मद्याचे दोन-चार घोट घेतले व त्या कप्तानास म्हटले, "देव तुमचे भले करो. विजय मात्र आमच्या नेपोलियन बादशहाचाच होवो. नेपोलियन बादशहा की जय!"

तो कप्तान माझी पाठ थोपटीत म्हणाला, "खरा सैनिक आहेस; जातो मी."

■ ■

## ११. धोतराचे भाग्य

आपल्या सेवकांचे आणि आश्रितांचे प्रेम संपादन करणे सर्वच धन्यांना जमते असे नाही. आणि ज्यांना जमते त्यांच्यावर जर विपत्ती आली तर मात्र त्या धन्यांची मोठी पंचाईत असते. सेवक आणि आश्रित त्यांना सोडायला तयार नसतात आणि त्यांच्या योगक्षेमाची तर काहीच तरतूद नसते; किंवा विपत्काली सेवक आणि आश्रित असणे पुष्कळच गैरसोयीचेच ठरते. म्हणून विपत्काली सेवकांचा आणि आश्रितांचा निरोप घेणे हे एक दिव्यच असते. श्रीरामचंद्र वनवासाला निघाले असता पुष्कळ प्रजाजन त्यांच्या पाठोपाठ वनवासास निघाले. रात्र पडली. सर्वांनी अरण्यातच मुक्काम

केला. पहाट होताच श्रीरामचंद्र सर्वांआधी उठले. सारथी, लक्ष्मण आणि सीतामाई यांना त्यांनी उठवले व ते गुपचूप अन्य कोणालाही न उठवता पुढे निघून गेले. नेपोलियनला एल्बा बेटावर ठेवायचे ठरले तेव्हा त्याच्याबरोबर तीनशे सैनिक फक्त असावेत असे त्याच्या शत्रूंनी बजावले. हां हां म्हणतां तीनशें लोकांची यादी झाली. तेवढ्यात एक शिपाई तेथे आला व स्वतःला बरोबर घ्या असा आग्रह धरू लागला. नेपोलियन म्हणाला " तीनशेची मर्यादा कधीच भरली आहे. " यावर तो शिपाई बोलला, " ठीक आहे. या तीनशेतील कोणातरी एकाला ठार मारून मी त्याची जागा घेतो. " नेपोलियनने गहिवरून जाऊन त्याला घेण्याची व्यवस्था केली. नेपोलियनप्रमाणेच पराभवाची पाळी १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धातील महान नेते नानासाहेब यांच्यावर आली ...

---

माझे नाव राघोबा. मी श्रीमंत बाजीराव पेशवे यांचे दत्तक चिरंजीव धोंडोपंत नानासाहेब यांचा शागीर्द. इ. स. १८५७ साली श्रीमंत नानासाहेबांनी इंग्रजांची सत्ता उलथून टाकण्यासाठी स्वातंत्र्ययुद्ध सुरू केले. बरेच दिवस कानपूर व आसपासच्या प्रदेशावर त्यांची सत्ता गाजत होती. गंगाकिनारी जरीपटका गर्वाने डोलत होता. पण पुनः ग्रह फिरले. इंग्रजांचा जोर झाला. श्रीमंत नानासाहेबांनी तूर्त कानपूर सोडावे असे ठरले. ते आणि त्यांची काही कुटुंबीय मंडळी एका नावेत बसली. पुष्कळ प्रजाजन त्यांच्याबरोबर जायला उत्सुक होते. पण डोळ्यांतले अश्रू दडवीत श्रीमंतांनी सर्वांचे निवारण केले.

" आमच्याबरोबर तुम्हीही वनवासी होऊ नका, " ते म्हणाले.

सर्वांनी ऐकले. मी मात्र होडी चालू होताच होडीत उडी घेतली व म्हटले, " श्रीमंत ! आपल्या चरणांवाचून अन्य थारा नाही मला. "

श्रीमंत खिन्नपणे हसले. पण त्यांनी मला अनुमती दिली. पुढे नाव एका अनोळखी ठिकाणी लागली. आम्ही सर्वजण उतरून चालू लागलो. हरहर! ज्या मंडळींनी कधीही पालखीमेण्यावाचून प्रवास केला नव्हता त्यांना आज धूळ तुडवीत पायी चालावे लागत होते.

पण फार काळ चाललो नाही तोच आमच्या छोट्या धन्यांनी म्हणायला सुरवात केली 'पाणी! पाणी!' जवळ एक विहीर तर दिसली, पण फार खोल. तिला पायऱ्या नाहीत. शेवटी माझे ठेवणीतले धोतर, श्रीमंत नानासाहेबांचे उपरणे व श्रीमंत रावसाहेबांचा रुमाल यांना गाठी बांधून भांडे पाण्यात सोडले. सर्वांची तहान भागली. माझ्या धोतराचे भाग्य थोर! काही क्षण का होईना त्याने राजवस्त्रांना मिठी मारली होती.

■ ■

## १२. शेवटचा प्रश्न

---

आली जरी कष्टदशा अपार। न टाकिती धैर्य तथापि थोर॥
धर्मराजावर संकटांमागून संकटे कोसळली. तरी त्याने आपले मनोधैर्य खचू दिले नाही. वनवास तर त्याच्या नशिबी आलाच; पण एकदा तर त्याच्या दृष्टीला एक भलतेच दृश्य पडले. एका तळ्याच्या काठी त्याचे चारही पराक्रमी बंधू मरून पडले होते. त्याही प्रसंगी तो अशा काही धैर्याने वागला की त्याची वाहवाच झाली.

---

मी जुगार खेळलो. हरलो. माझे राज्य कौरवांनी घेतले. आम्हांला वनवासास जावे लागले. एकदा लागली मला खूप तहान. सहदेव

म्हणाला, "तुम्ही इथेच थांबा. मी पाणी घेऊन येतो." पण बराच वेळ झाला तरी तो परत येईना. म्हणून नकुल त्याला शोधायला गेला. तोही आला नाही म्हणून गेला अर्जुन. पण तोही परतला नाही. मग भीम गेला. भीमही आला नाही असे पाहून मी स्वतःच निघालो. हिंडता हिंडता एक तळे दिसले आणि त्याच्या काठाशी मला माझे चौघेही बंधू मरून पडलेले दिसले.

मला खूप दुःख झाले. तोच कोठून तरी माझ्या कानांवर शब्द पडले, "युधिष्ठिरा! मी या तळ्याचा रक्षक यक्ष आहे. सहदेव इथे आला. मी त्यास म्हटले, 'आधी माझ्या प्रश्नाचे उत्तर दे, मगच पाणी पी.' त्याने माझे म्हणणे धुडकावून लावले व तो पाणी पिऊ लागला. तोच तो मरून पडला. नंतर आलेल्या तुझ्या इतर तिघा भावांच्या बाबतीतही हाच प्रकार घडला. तूही माझ्या प्रश्नांची उत्तरे दिल्यावाचून या तळ्याचे पाणी पिऊ शकणार नाहीस.'

मी त्याला म्हटले, 'विचार.' त्याने मला अनेक प्रश्न विचारले. मी त्यांची उत्तरे दिली. शेवटी तो म्हणाला, "मी तुझी उत्तरे ऐकून प्रसन्न झालो आहे. तुझ्या कोणत्या तरी एका भावाला जिवंत करण्याचे माझ्या अंगी सामर्थ्य आहे. बोल, कोणाला जिवंत करू?" प्रश्न संपले असे भासवून त्या यक्षाने मला हा शेवटचा म्हणून प्रश्न विचारला होता. मी त्यास म्हटले, "नकुलास उठाव."

आश्चर्याने तो यक्ष म्हणाला, "अरे! शक्तिमान भीम किंवा पराक्रमी अर्जुन यांच्याऐवजी तू नकुलाला जिवंत करायला का सांगतोस?"

मी उत्तर केले, "यक्षा! पंडुराजाच्या दोन पत्नी. कुंती आणि माद्री. कुंतीचा एक पुत्र म्हणजे मी जिवंत आहे. माद्रीचाही एक मुलगा जिवंत हवा. म्हणून माझे हे मागणे."

यक्ष प्रकट झाला व म्हणाला, "मला तुझे हे उत्तर आवडले. मी आता तुझ्या सर्वच भावांना जिवंत करतो"

■ ■

## १३. देवा ! मला निपुत्रिक कर !

धर्मराजाची न्यायबुद्धी जागृत होती म्हणून त्याने भीमार्जुनांपैकी कोणाला जिवंत कर असे न म्हणता नकुलाला जिवंत कर अशी तळ्याच्या काठी असलेल्या यक्षाला विनंती केली. सौराष्ट्रात विमलशहा म्हणून एक परोपकारी प्रधान होऊन गेला. त्यालाही एकदा तहान लागली म्हणून तो एका विहिरीजवळ गेला. त्या विहिरीच्या काठावर बसलेल्या एका माणसाने काही एक अट सांगून यक्षाने धर्मराजाला पाणी पिण्यास अडथळा आणला तसा विमलशहाला अडथळा आणला. ती अट ऐकून विमलशहा माघारी वळला व त्याने देवाजवळ एक कठोर मागणे मागितले.

प्रवाशांच्या सोयीसाठी रस्त्याच्या कडेला झाडे लावावीत, विहिरी खोदाव्यात, मोठमोठी देवळे बांधावीत याची मला फार हौस.

एकदा मी परप्रांतात हिंडत असता मला लागली तहान. जवळच एक विहीर दिसली. लगबगीने तेथे गेलो व पायऱ्या उतरू लागलो, तो विहिरीच्या काठावर बसलेल्या एका माणसाने मला दरडावून म्हटले, "ए ! आधी माझे पैसे टाक. मग पाणी पी."

मी विचारले, "कसले पैसे ?" तो माणूस म्हणाला, "ही विहीर बांधली आहे माझ्या बापजाद्यांनी. सबब ही विहीर माझ्या मालकीची

आहे. मी येथे पाणी पिण्यासाठी येणाऱ्या प्रत्येकाकडून पैसे घेत असतो."

मी माघारी वळलो. जवळच्या एका देवळात जाऊन देवापुढे हात जोडून उभा राहिलो व देवाला म्हणालो, "देवा! या स्वार्थी माणसाप्रमाणेच माझे वंशजही मी बांधलेल्या विहिरींच्या काठावर बसून तहानेलेल्या प्रवाशांकडून पैसे उकळत राहतील. म्हणून म्हणतो देवा! मला निपुत्रिकच कर."

■ ■

# १४. सर्वांभूती एकच आत्मा

---

पुत् नावाच्या नरकात पडण्यापासून वाचवतो तो, अशी हिंदु-धर्मशास्त्राची पुत्र शब्दाची व्याख्या आहे. विमलशहाने "निपुत्रिक कर" अशी मागणी करून एकप्रकारे परलोकी नरकवास मिळाला तरी चालेल असेच दर्शवले नाही का? महाराष्ट्रातही एक संत असा निघाला की ज्याने पण रूढ समजुतीप्रमाणे पुण्य प्राप्त करून देणारे साधन आपण होऊन नष्ट केले. त्या संताचे नाव एकनाथ महाराज.

---

त्या दिवशी आमच्या मालकाचे काय बिनसले होते कोणास ठाऊक? त्याने मला व मोत्या कुत्र्याला भाकरीचा शिळा तुकडासुद्धा घातला नाही. रात्र झाली. आमचा मालक गेला झोपी. आमच्या मालकाने परटाच्या धंद्यात खूप पैसा कमवला होता. त्याच्या लोभाने त्या रात्री आले चोर.

कोणीही अनोळखी माणूस दिसला की भुंकणारा मोत्या आज मात्र गप्प होता. मी मोत्याला म्हटले, "मोत्या, भुंक ना! चोर आले आहेत. आपल्या धन्याला जागे कर."

मोत्या गुरगुरत म्हणाला, "लुटू दे धन्याचे घर चोरांना. दिवसभर आमच्यापासून काम करून घेऊन वर आम्हांला उपाशी ठेवले. बरे झाले चोर आले ते."

मला राहवेना. मीच मग मोठ्याने ओरडायला सुरवात केली. माझ्या आवाजाने चोर सावध झाले. पळून गेले. मालक बाहेर आला. त्याचा भाऊही बाहेर आला. मालकाचा भाऊ म्हणाला, "चोर आले होते ते पळून गेले वाटते?"

मालक म्हणाला, "चोर नाही नि बीर नाही. चोर आले असते तर मोत्या कुत्रा नसता का भुंकला? हे लांबकाने गाढव उगाचच ओरडले. अशी छान झोप लागली होती!" आणि त्याने काठी हातात घेऊन मला बडव बडव बडवले. माझी हाडे अगदी खिळखिळी झाली.

मालक पुनः जाऊन झोपला. मोत्या हसून म्हणाला, "जादा अक्कल दाखवायला गेलास. 'जेनु काम तेनु थाय बिजा करे सो गोतु खाय' हे विसरलास व फुकट मार मात्र खाल्लास. गाढव रे गाढव!"

मी काहीच बोललो नाही. मात्र थोड्या वेळाने मी तेथून पळच काढला.

दिवस उजाडेपर्यंत मी पळतच राहिलो आणि मग माझ्या लक्षात आले की, आपण एका वाळवंटात आलो आहोत. जिकडे नजर टाकावी तिकडे वाळूच. हलके हलके चालू लागलो. वाटले आता वाळवंट संपेल – मग वाळवंट संपेल. पण छेः दुपार झाली. सूर्याने आपले बाराही डोळे वटारले. माझे पाय लटपटू लागले. तहानेने घशाला कोरड पडू लागली. एकदा वाटले की, असेच माघारी जावे. मालकाच्या

पाया पडावे. पण मी तडफडून स्वतःचाच धिक्कार केला. मनाशी म्हटले, "तहानेने व्याकुळ होऊन मी मरेन पण पुनः त्या दुष्ट मालकाकडे जाणार नाही." मी तेथेच बसकण मारली. आणि शांतपणे देवाचा धावा करू लागलो. देवाने गजेंद्राचा धांवा ऐकून धाव घेतली होती. माझा धावा ऐकून देव धावत येईल का असा विचार मधूनच मनात डोकावत होता.

"पांडुरंग हरी। पांडुरंग हरी ... विठ्ठल विठ्ठल."

माझ्या कानांवर शब्द पडू लागले. थोड्याच वेळात हातांत छोट्या छोट्या कावडी घेतलेले बरेचसे लोक दिसले. मला तडफडताना पाहून प्रत्येकजण हळहळला. पण पुढे आला मात्र एकच. त्याने आपल्याजवळील-कावडीतील पाणी माझ्या तोंडात ओतले. बाकीचे लोक म्हणूं लागले, "हाः हाः एकनाथ महाराज! हे काय केलेत? एवढ्या प्रयासाने काशीची गंगा आपण येथवर आणलीत; रामेश्वर अगदी जवळ आले आहे आणि अशा वेळी आपण ती पवित्र गंगा खुशाल या गाढवाच्या घशांत ओतलीत? सारी यात्रा निष्फळ झाली ना आपली?"

त्यावर तो माणूस हसून उत्तरला, "वेड्यांनो! सर्वांभूती एकच आत्मा. माझी यात्रा याच क्षणी – याच स्थळी सफल झाली आहे."

मी ताडकन उभा राहिलो. त्या थोर मनाच्या माणसाकडे पाहून एकदा आनंदाने खिंकाळलो आणि मग सुसाट धावतच सुटलो.

■ ■

# १५. मी जागचा हललो नाही

संतांची सर्वभूती एकच भावना इतकी प्रभावी असते की पशु-पक्षीसुद्धा त्यांच्याजवळ निर्भयतेने राहतात. वाल्मीकी ऋषींच्या आश्रमात सिंह आणि हरणे एकत्र राहत असत. कण्व ऋषींच्या आश्रमातही बरीच हरणे होती. कण्व ऋषींच्या आश्रमाच्या परिसरात शिकारीला अप्रत्यक्ष बंदीच होती असे म्हणायला काही हरकत नाही. तरीसुद्धा एकदा एक शिकारी चुकून तेथे हरणांची शिकार करायल आलाच !

माझे नाव दीर्घोपांग. कण्वऋषींच्या आश्रमात तशी बरीच हरणे होती. पण त्यांच्या मानसकन्येचे – शकुंतलेचें माझ्यावरच जास्त प्रेम होते. एक दिवस माझा एक मित्र घाबऱ्या घाबऱ्या धावत आला. म्हणाला, “ या अरण्यात एक शिकारी आला आहे. त्याने माझा पाठ-लागसुद्धा केला पण मी त्याला झुकांडी दिली. ”

आम्ही सर्वजण काळजीत पडलो. एकदा माझ्या मित्राने मला तो शिकारी दाखवलासुद्धा. शकुंतलेशी तो बोलत होता. हसून बोलत होता. नक्कीच तो म्हणत असेल की, “ मला तुमच्या आश्रमातील हरणांची शिकार करायची आहे. मला परवानगी द्या. ”

आम्ही सर्वांनी ठरवले की, आश्रमातून तो शिकारी निघून जाईपर्यंत शकुंतलेच्याही आसपास फिरकायचे नाही.

पण एक दिवस काय झाले, दुपारच्या वेळी मला लागली तहान. मी तळ्याकडे निघालो. तळ्याच्या अलीकडेच जाईचा मंडप होता. आणि तेथे शकुंतला आणि तो शिकारी दोघे बोलत होती. मी थबकलो.

मनात म्हटले, “आता माझी शंभर वर्षे भरली! हा शिकारी मला आता काही जिवंत सोडीत नाही.” त्या शिकाऱ्याच्या हातात होता पाण्याने भरलेला कमळाच्या पानांचा द्रोण. तो शकुंतलेला म्हणाला, “हे हरीण तहानेलेले दिसतेय्.” आणि त्याने माझ्यापुढे तो द्रोण केला. मला त्याचा डाव समजला. पाण्याचे आमिष दाखवून जवळ बोलवायचे आणि पटकन मला धरायचे. मी जागचा हललोच नाही.

शकुंतलेने मग त्याच्या हातून तो द्रोण घेतला व मला म्हटले, “दीर्घापांगा ये. पाणी पी.” मी हळूहळू तिच्याजवळ गेलो व द्रोणातले सारे पाणी पिऊन टाकले. शिकारी चांगलाच खजिल झाला. पण तो मोठ्याने हसला व म्हणाला, “जो तो आपल्याच माणसावर विश्वास ठेवतो तर!”

मी मुळी तेथे थांबलोच नाही. एकदम पळून गेलो.



## १६. शाप की वरदान ?

ही कथा आहे रामायणातली. राजा दशरथाला मिळालेला शापच एकप्रकारे वरदानासारखा कसा ठरला त्या विलक्षण हकीकतीची. यातले वैशिष्ट्य असे की, सर्वच तृषार्त. दोघांना तहान पाण्याची तर एकाला पुत्राची.

मी अयोध्येचा राजा दशरथ. माझे राज्य मोठे होते. माझे प्रधान हुशार होते. माझ्या तीन राण्या सुस्वभावी होत्या. माझ्या प्रजेचे माझ्यावर प्रेम होते. वसिष्ठांसारखे गुरू मला लाभले होते. पण तरीही मी दुःखी होतो. मला मूल नव्हते. एका रात्री मला स्वप्न पडले. माझ्या हातून दोन वृद्ध आणि एक तरुण अशा तीन जीवांची हत्या झाली – असे त्यात दिसले. मी दचकून जागा झालो. पहाट होताच मी कुलगुरू वसिष्ठांकडे गेलो. त्यांना स्वप्न सांगितले. ते म्हणाले, " अरे पडतात अशी वेडीवाकडी स्वप्ने. तू असे कर. अरण्यात जा. तीन क्रूर श्वापदे मार. माझ्याकडे ये. आपण मग काहीतरी शांती करू. "

मी अरण्यात गेलो. दिवसभर हिंडलो. पण एकही शिकार सापडली नाही. संध्याकाळ झाली. मी विचार केला, ' आता श्वापदे नदीवर पाणी प्यायला येतील. त्यांची शिकार साधावी. ' मी एका झाडावर दडून राहिलो. थोड्या वेळाने नदीच्या बाजूने बुड्बुड् आवाज ऐकू येऊ लागला. मला आवाजाच्या रोखाने बाण मारायची विद्या अवगत होती. मी बाण सोडला, तोच ' मेलो, मेलो, ' अशी किंकाळी माझ्या कानांवर आली. माझ्या हातांतील धनुष्यबाण गळून पडले. मी धावतच किंकाळीच्या दिशेने गेलो. एक तरुण माझ्या बाणाने घायाळ होऊन पडला होता. मी त्याच्याजवळ गेलो व हळहळू लागलो. स्वतःला दोष देऊ लागलो.

तो तरुण म्हणाला, "राजा ! माझ्या नशिबातच अपघाती मरण होते. तू निमित्तमात्र झालास. पण आता माझ्यापाशी घुटमळू नकोस. मी माझ्या अंध आणि वृद्ध आईवडलांना घेऊन तीर्थयात्रेला निघालो होतो. दिवसा धूळ फार व माणसांची वर्दळ खूप म्हणून मी रात्री प्रवास करीत असे. मघाशी माझे आई-वडील म्हणाले, 'बाळ श्रावणा ! आम्हांला तहान लागली आहे.' मी त्यांना एका झाडाखाली थांबवून पाणी आणायला येथे आलो. तोच तुझा बाण मला लागला.




तू आता येथे थांबू नकोस. माझ्या आई-वडिलांना पाणी नेऊन दे ... अरे देवा ... ' बोलता बोलता श्रावणाचा प्राण गेला.

मला मोठा प्रश्न पडला. ही दुःखद वार्ता त्या दोघांना सांगायची तरी कशी ? मी कमंडलूत पाणी भरून घेतले व त्या वृद्धांकडे गेलो. माझी चाहूल लागताच ती दोघे आनंदून म्हणाली, "आला आमचा श्रावण बाळ." मी काहीच न बोलता त्यांच्यापुढे पाणी ठेवले. "तू बोलला नाहीस तर आम्ही पाणी घेणारच नाही." असे त्यांनी निक्षून म्हणताच मला त्यांना खरी हकीगत सांगावी लागली. त्यांनी मोठ्याने

हंबरडाच फोडला. “ अरे श्रावणबाळा ... असा कसा रे आम्हांला सोडून गेलास ? आम्हांला या वेळी कशाला तहान लागली ? आमची तहान जीवघेणी ठरली. पण हे राजा, तू आम्हा आंधळ्यांची काठीच काढून घेतलीस. तूही आमच्यासारखाच पुत्रशोकाने प्राण सोडशील ! ” आणि त्यांनी प्राणत्याग केला.

माझे दुष्ट स्वप्न खरे ठरले. तीन निष्पाप जीवांची हत्या माझ्या माथी पडली. मी खिन्न मनाने परतू लागलो. मध्येच मी थांबलो. आणि टाळीच वाजवली. त्या वृद्धांनी म्हटले होते, “ आमच्यासारखाच तूही पुत्रशोकाने मरशील. ” त्यांनी तळतळून दिलेला तो शाप खरा ठरण्या-साठी मला पुत्रशोक होणे अवश्य होते. आणि पुत्रशोक होण्यासाठी मला पुत्र होणे अवश्य होते. मला पुत्र होणार होते. मला पुत्र होणार होते. ...

■ ■


## १७. माझ्या काळजात कसेसेच झाले !

न्यायबलाशी संबंधित ही कथा — पण लिहिली आहे मारेकरी शिपायाच्या दृष्टिकोनातून.

शिपाई म्हटला की तो थोडाबहुत कठोर असावाच लागतो. वरिष्ठाने “ हल्ला करा ” असा हुकूम दिला की मागचापुढचा विचार न करता आम्ही हल्ला चढवतो. अधिकारी म्हणाले, “ या माणसाला ठार करा. ” आम्ही त्यास ठार करतो. असा विचार नाही करीत की हा तरुण आहे, हा म्हातारा आहे. हा अपराधी का निरपराधी असाही

विचार आम्ही करीत नाही. जरुशलेममध्ये आल्यापासून मी किती तरी लोकांना क्रूसावर खिळे ठोकून ठार केले आहे.

त्या दिवशी आम्ही अशाच तिघाजणांना क्रूसावर खिळविले. त्यांतले दोघेजण पक्के बदमाष होते. मधला मात्र बदमाष दिसत नव्हता. त्याचा चेहरा अतिशय शांत दिसत होता. मी मित्राला विचारले, " याने काय गुन्हा केला रे ? " मित्र म्हणाला, " हा लोकांना ' चांगले




वागा. शेजाऱ्यावर प्रेम करा ... कोणाची चोरी करू नका ' असा भलताच उपदेश करीत हिंडत होता. स्वतःला राजा समजत होता. "

मला एकदम हसूच आले. काही तरी वेडगळच उपदेश होता त्या माणसाचा. म्हणे ' चांगले वागा. ' चांगले वागून कोणाचे भले झाले आहे ? म्हणे ' शेजाऱ्यावर प्रेम करा ' ... माझा शेजारी फार

लबाड माणूस आहे. काही उसने मागायला गेलो की म्हणतो ... ' शिल्लक नाही. ' असल्या शेजाऱ्यावर कसे प्रेम करायचे ? हा माणूस स्वतःला राजा म्हणवतो काय ? राजाला मुगुट असतो. याला कोठे आहे मुगुट ? मला एक कल्पना सुचली. मी तीक्ष्ण काट्यांचा एक मुगुट तयार केला व तो दिला त्याच्या मस्तकावर ठेवून. त्याच्या गळ्यात पाटी अडकवली ' हा राजा आहे. '

जमलेले लोक खो-खो करून हसूच लागले. ते पाहून मला आणखीच चेव आला. मी त्याची जास्त जास्त मस्करी करू लागलो. तेवढ्यात तो माणूस ... ( त्याला येशू म्हणत ) म्हणाला, " मला तहान लागली आहे. "

त्याचे हे शब्द ऐकताच मात्र माझ्या काळजात कसेतरीच झाले. ओरडून ओरडून माझाही घसा कोरडा पडून मला तहान लागली होती. यालाही तहान लागली होती, ' अरे ... मी जसा माणूस तसा हाही एक माणूसच आहे ' ... या गोष्टीची मला जाणीव झाली. मला आता-पर्यंतच्या माझ्या वर्तनाची शरम वाटू लागली. मी धावत गेलो. एका ठिकाणी आंब ठेवली होती. मी आंबेत स्पंज बुडवला व तो स्पंज वेताच्या छडीवर ठेवून त्याला चोखायला दिला. त्याने तो थोडा चोखला व म्हटले " आता पुरे. " आणि तशाही स्थितीत त्याने माझ्याकडे प्रेमाने पाहिले. मला वाटले, धरणी दुभंगावी आणि तिने मला गिळून टाकावे. बाकीच्या लोकांची शिवीगाळ चालूच होती. येशू म्हणाला, " देवा ! त्यांना क्षमा कर, आपण काय करतो हे त्यांना समजत नाही. "

किती थोर मनाचा माणूस ! आम्ही मात्र त्यास ठार केले होते.

■ ■

# १८. प्रेमाने रागावर मात केली

हो एक इतिहासकथाच म्हणावी लागेल. फार प्राचीन काळात घडलेली. पण मनुष्यस्वभाव काही, काळ पालटला म्हणून पालटतो थोडाच !

यहुदी लोकांतील काहीजणांनी येशू ख्रिस्ताची शिकवण पत्करली. बाकी यहुदी त्यांचा द्वेष करीत. अशाच एका यहुदी सावकाराच्या मुलीने एका ख्रिस्ती माणसाशी लग्न केले. पुढे ती मुलगी एका मुलीला जन्म देऊन मरण पावली. त्या यहुदी सावकाराने आपल्या नातीचा सांभाळ केला. त्या नातीचे नाव मरियम.

मरियम ज्या आश्रमात शिकत होती त्याच आश्रमात कॅलेब नावाचा एक यहुदी मुलगा होता. त्याचे मरियमवर प्रेम बसले. पण मरियमचे प्रेम मात्र मार्कस नावाच्या रोमन सरदारावर बसले होते. कॅलेब मार्कसचा द्वेष करू लागला.

पुढे टायर शहराच्या यहुदी लोकांनी रोमन लोकांविरुद्ध बंड पुकारले. टायरला वेढा पडला. यहुद्यांचा पराभव होऊ लागला. त्यांना वाटले की, ख्रिस्ती झालेल्या मरियमचाच पायगुण फार वाईट आहे.

कॅलेब हा यहुद्यांचा मोठा सरदार झाला होता. त्याचे न ऐकता यहुद्यांनी मरियमला एका उंच घराच्या गच्चीवरील एका खांबाला बांधून ठेवले.

दिवस उजाडला. लढाईला तोंड लागले. सूर्य वर चढत होता. मरियमचे प्राण कासावीस होत होते. घोटभर पाण्यासाठी तिची तगमग चालू होती. दुपार झाली. मरियमला ज्या खांबावर बांधले होते त्या खांबावर एक बाण आला. तो मरियमच्या पायांपासून दोनच

इंचांवर रुतून बसला. मरियमने पाहिले तो त्या बाणाला पाण्याची छोटी कातडी पिशवी बांधलेली होती. मरियमने पाहिले की...बाण ज्या दिशेने आला तेथे कॅलेब लढत आहे. कॅलेबनेच मरियमकडे तो बाण सोडला होता. या प्रसंगाने हेच सिद्ध झाले की, खरे प्रेम राग-द्वेष यांच्यावर मात करते. मरियमने महाप्रयासाने ती पाण्याची पिशवी हातात आणली व तिच्यातले पाणी प्राशन करून 'देवा! कॅलेबचे भले कर.' अशी प्रार्थना केली.

[ हा सर्व वृत्तांत ओ नील नावाच्या कादंबरीकाराच्या एका कादंबरीतला आहे. ]

■ ■

## १९. मी पाण्याचा प्याला फेकून दिला

---

प्रतिज्ञापालन ही कठोर कसोटी आहे. तहानभुकेवरही मात करून तिचे तंतोतंत पालन करणे फार कठीण. पण हिंदुस्थानाच्या इतिहासात असे शेकडो प्रसंग घडलेले आहेत.

---

राजसिंह महाराजांनी मला हाक मारून म्हटले, "बाळ भीमसिंहा! माझे आता वय झाले. तू आणि तुझा धाकटा सावत्र भाऊ जयसिंह यांमध्ये माझा अधिक ओढा जयसिंहाकडे आहे. उदेपूरची गादी जयसिंहालाच द्यावी असे मला वाटते आहे. पण माझ्या माघारी तू इतरांचे साह्य घेऊन जयसिंहाचा काटा काढशील अशी मला भीती वाटते. तसे होण्यापेक्षा तू माझ्यासमोरच या जयसिंहाचा वध केलेला बरा."

मी म्हटले, "बाबा! तुम्ही जयसिंहाला राजा केलेत तर मी त्याची चाकरी करीन. पण त्यापेक्षा तुम्हांला शंका वाटू नये म्हणून मी याच क्षणी हे राज्य कायमचा सोडून जातो. दोबारीच्या आत पाणी पिईन तर तुमच्या पोटचाच नव्हे." आणि त्यांना नमस्कार करून मी शागीर्दासह निघालो.

खूप वेळ वाटचाल केल्यानंतर मी विश्रांतीस्तव एका झऱ्याच्या काठच्या झाडाच्या सावलीत बसलो. शागीर्दाने पडशीतून रुप्याचा प्याला काढला व तो पाण्याने भरून माझ्यापुढे केला. मला तहान लागलीच होती. मी मोठ्या आनंदाने तो प्याला ओठाजवळ नेला आणि एकदम मला माझ्या प्रतिज्ञेची आठवण झाली. अजून मी दोबारीच्या आतच आहे. मी लागलीच पाणी ओतून देऊन तो प्याला दूर भिरकावून दिला. शागीर्द माझ्या तोंडाकडे पाहतच राहिला.



## २०. एवढी दगदग कोण करतो !

संतांचे सारेच काही वेगळे ! महाराष्ट्रातल्या त्या प्रख्यात दोन संतांना लागलेली तहान किती आगळ्या तऱ्हेने भागली !

निवृत्तिदादांना मी म्हटले, " आपण एकदा तीर्थयात्रा करू. " दादा म्हणाले, " कल्पना चांगली आहे. आपण आणखीही काही भक्त-मंडळींना बरोबर घेऊ. "

बरेच लोक यायला सिद्ध झाले. पंढरीचे नामदेव मात्र म्हणाले, " कशाला तीर्थयात्रा करायची ? मला पंढरपूरच छान वाटते. " पण फारच आग्रह केल्यानंतर तेही आमच्या मेळाव्यात प्रविष्ट झाले.

एके दिवशी मारवाडातील एका गावी आमचा मुक्काम पडला. मी नामदेवांना म्हटले, " चला, जरा पाय मोकळे करून येऊ. " ते म्हणाले,



" चला. " बोलण्याच्या नादात आम्ही खूप दूर गेलो. दोघांनाही तहान लागली. इकडे तिकडे हिंडल्यावर एक विहीर आढळली. पण तिचे पाणी होते खोल. तिला पायऱ्याही नव्हत्या. मी नामदेवांना म्हटले, " आपण सूक्ष्मरूप धारण करू. तळाशी जाऊ. पाणी पिऊ. " नामदेव म्हणाले " ज्ञानेश्वरा, एवढी दगदग कोण करतो ! करू देवाचा धावा. " त्यांनी धावा सुरू केला आणि आश्चर्याची गोष्ट अशी की, प्रलयकालचा समुद्र खवळावा तसे त्या विहिरीतले पाणी खवळून काठापर्यंत येऊन ठेपले. मी नामदेवांना म्हटले, " देवाला तुम्ही भलतेच कह्यात ठेवलेले दिसतेय. " नामदेव नुसते हसले. आम्ही दोघांनी ते पाणी प्राशन केले हे वेगळे सांगायला नकोच. सच्चिदानंद ! सच्चिदानंद !

■ ■

## २१. चतुर सेवक

---

सामान्य माणसालाही प्रसंग पडला म्हणजे मोठे शहाणपण सुचते. नादीरशहाच्या स्वारीत दिल्लीत घडलेल्या एका प्रसंगाचे हे चित्रण.


---

खूप मोठे सैन्य घेऊन मी इराणातून निघालो व देशामागून देश जिंकीत दिल्लीवर हल्ला करून दिल्ली ताब्यात घेतली. दिल्लीचा बादशहा माझा कैदी झाला. मी दिल्ली शहराची खूप लूट केली.

मधून मधून मी दिल्लीच्या बादशहाच्या महालात जाऊन त्याच्याशी गप्पा करीत असे. एके दिवशी मला तहान लागली. बादशहाने आपल्या खास हुजऱ्यास हाक मारून म्हटले, " सरबत घेऊन ये. "

थोड्या वेळाने दोन प्याले घेऊन तो हुजऱ्या आला आणि घुटमळू लागला. आधी कोणाच्या हातात प्याला द्यावा याचा त्यास विचार पडला. ' नादीरशहाचे हातात आधी प्याला द्यावा तर आपल्या धन्याचा अपमान होतो व धन्याचे हातात आधी प्याला द्यावा तर नादीरशहाचा अपमान होतो. तसे झाले तर भरलीच शंभर वर्षे! ' थोडा वेळ विचार करून त्याने दोन्ही प्याले आपल्या बादशहाचे हाती दिले व म्हटले, " हुजूर ! मी आपणांस नित्यच प्याले देत असतो. आपण स्वहस्ते हा प्याला आपल्या बड्या पाहुण्यांच्या हातात देऊन त्यांचा बहुमान करावा. "

" वाहवा ! " माझ्या तोंडून उद्गार निघाले. " अहो दिल्लीकर बादशहा ! या चतुर हुजऱ्यासारखी पंचवीस-तीस माणसे जर तुमच्या जवळ असती तर मला येथपर्यंत चाल करून येणेच मुष्किल झाले असते यात शंका नाही. "




# २२. मुली, तू शूर आहेस !

नेपोलियन हा मोठा गुणग्राहक होता. त्याच्या गुणग्राहकतेच्या एका पैलूचे हे दृश्य.

मला जगज्जेता नेपोलियन म्हणतात. पण मला हे पद मिळायला माझे शूर शिपाईच बहुतांशी कारणीभूत झाले. एखादा धडधाकट तरुण दिसला की माझ्या मनात विचार येतो – 'याच्या अंगावर फ्रेंच सैनिकाचा पोशाख चढवला तर हा किती सुंदर दिसेल !' एकपरीने मला मुळी वेडच आहे शिपायांचे.

एकदा काय झाले मी एका नदीवर पूल बांधून घेत होतो. समोरून शत्रूच्या तोफा आग ओकीत होत्या. मी कशाचीही पर्वा न करता अगदी मोक्याच्या ठिकाणी होतो. (माझे सरदार म्हणत, "सरकार ! आपण थोडे आडोशाला उभे राहावे." मी म्हणे, "घाबरू नका. मला ठार करील असा गोळा ओतला गेलेला नाही." गंमत अशी मी जवळ जवळ सहाशे चकमकींत मी भाग घेतला असेन ... पण एकदाच फक्त माझ्या घोड्याला बंदुकीची गोळी लागली होती.)

मध्येच लागली मला तहान. मी अशा काही अडचणीच्या ठिकाणी उभा होतो की माझ्या शिपायांपैकी एकहीजण माझ्याकडे पाणी घेऊन येऊ शकत नव्हता. मी सरळ नदीच्या पाण्यावरील शेवाळे दूर करून ते पाणी पिण्यास तयार झालो. जवळच एक घर होते. तशाही स्थितीत तेथे माणसे राहत होती. मी शेवाळे दूर करीत आहे, असे पाहताच त्या घरातली एक तरुण मुलगी निर्मळ, थंड पाण्याने भरलेला प्याला घेऊन माझ्याकडे आली व म्हणाली, "सरकार ! हे पाणी चांगले आहे."



मला त्या मुलीच्या धिटाईचे व धाडसाचे कौतुक वाटले. पाणी पिऊन झाल्यावर मी तिला म्हटले, "मुली ! तू माझ्या शिपायांइतकीच शूर आहेस. तू म्हणत असशील तर मी तुला शिपायाचा पोशाख देऊन माझ्या सैन्यात भरती करून घेतो." ती धीट मुलगी लाजली आणि घरात पळून गेली. मी पुनः पुलाच्या कामाकडे लक्ष देऊ लागलो.

■ ■

## २३. अभिनय म्हणजे सत्य नव्हे

---

नकल्या आणि गाढवेकर याची जुन्या पाठ्यपुस्तकात असलेली गोष्ट अनेकांच्या परिचयाची असेल. त्या जातीतलीच ही एक कथा — रंगभूमीवरची.


---

आपल्याच तोंडाने आपली स्तुती सांगू नये असे म्हणतात. पण सांगितल्यावाचून राहवत नाही हेही खरेच.

एके काळी मी एक अतिशय नावाजलेली नटी म्हणून प्रसिद्ध होते. लोक म्हणत, " अभिनय पाहावा तर हिचाच."

एकदा एका प्रख्यात नाटकात माझ्याकडे वाळवंटात चुकलेल्या तरुणीची भूमिका आली होती. त्या वेळी मी अभिनयाची कमाल करी. इकडेतिकडे हिंडल्यावर नायिकेला लागते तहान आणि ती करुण स्वरात म्हणते, " पाणी ! पाणी ! घोटभरसुद्धा पाणी मला मिळायचे नाही का ? " माझे हे उद्गार ऐकताच प्रेक्षकातील कोमल मनाच्या स्त्रिया तर चक्क हुंदके देऊ लागत.

या नाटकाचे ठिकठिकाणी प्रयोग होऊ लागले. पण पुढे पुढे काय गंमत होऊ लागली की या प्रवेशात मला खरोखरच तहान लागू



लागली. आणि त्यामुळे माझ्या तोंडून कधी कधी शब्दही उमटेनासे झाले. काय करावे ते मला समजेना.

एके दिवशी अचानकपणे मला एक मजेदार युक्ती सुचली. रंग-भूमीवर वाळवंटाचा देखावा दिसावा म्हणून वाळूचे दोन मोठमोठे ढिगारे उभारलेले असत. एका ढिगाऱ्याच्या मागे मी पाण्याने भरलेले भांडे ठेवून दिले व " पाणी ! पाणी ! असे म्हणत म्हणत जणू पाण्या-चाच शोध घ्यायला निघाले. अशा थाटात मी त्या ढिगाऱ्यामागे गेले. दोन-तीन घोट पाणी प्याले व पुनः ढिगाऱ्यासमोर येऊन म्हणू लागले, " नाही ... तेथेसुद्धा पाणी नाही. घोटभर सुद्धा पाणी मला मिळणार नाही का ? "

प्रेक्षकांतून हुंदके ऐकू येत. मी वरवर रडत असे पण आतून मात्र मला हसू येत असे.


■ ■

## २४. तहानेपुढे परीक्षाही तुच्छ

विद्यार्थ्यांच्या परिचयातली ही एक – कथा परीक्षागृहात घडलेली.

मी अकरावीत गेलो. वर्षभर मानेवर खडा ठेवून अभ्यास केला. घोकंपट्टी केली. आनंदाची गोष्ट अशी होती की आतापर्यंत आमच्या गावातील मुलांना मॅट्रिकची परीक्षा देण्यासाठी परगावी जावे लागे. पण यंदापासून आमच्याच गावी परीक्षेचे केंद्र उघडले होते.

होता होता परीक्षेचा दिवस उजाडला. देवाला नमस्कार केला. आई-वडिलांना नमस्कार केला. हाताला घड्याळ बांधले. लेखनसाहित्य




नीट आहे ना ते तपासून पाहिले. परीक्षाकेंद्रावर गेलो, अभ्यास नीट झाला होता, तरीसुद्धा धास्ती वाटत होती.

अकरा वाजले. जो तो आपापल्या जागेवर बसला. प्रश्नपत्रिका वाटल्या गेल्या. उत्तरपत्रिकेवर विषयाचे नाव लिहिले.

भराभर लिहू लागलो. दहा-पंधरा मिनिटे झाली असतील नसतील, मला लागली तहान. मी पेनने बाकावर 'टक्टक्' केले. पर्यवेक्षकांचे माझ्याकडे लक्ष गेले. मी म्हटले, " मला पाणी हवे आहे."

पर्यवेक्षकांनी इकडे तिकडे पाहिले. परीक्षागृहात दुसरे दोन पर्यवेक्षक होते. त्यांना त्यांनी बोलावले. हलक्या आवाजात काही कुजबूज केली. एक पर्यवेक्षक बाहेर गेले. थोड्या वेळाने ते परत आले. हा वेळपर्यंत आमच्याच परीक्षागृहामधील मुलांना नव्हे तर इतर खोल्यांमधील मुलांनाही समजून चुकले की, केंद्रचालकांनी पाणी

पुरविण्याची काहीच व्यवस्था केलेली नाही. पटापट सर्वांनी आपल्या लेखण्या खाली ठेवल्या व म्हटले, " मिळणार नाही जोवर पाणी। उचलणार नाही तोवर लेखणी."

'तहान लागणे व ती लागताच पाणी पिणे हा प्रत्येक प्राणिमात्राचा जन्मसिद्ध हक्क आहे. आणि आम्ही तो बजावणारच,' अशी जणू आम्ही भूमिका घेतली होती. आतापर्यंत आम्हांला परीक्षेपुढे बाकी सर्व तुच्छ होते. आता तहानेपुढे परीक्षाही तुच्छ वाटत होती.

केंद्रचालकांनी धावपळ करून नगरपालिकेचे टँकर मागवले. मुलांना पाणी मिळाले. आणि मगच पुनः सर्वांनी उत्तरपत्रिका लिहायला सुरवात केली.

■ ■

## २५. केल्याने होत आहे रे !

काव ! काव ! काव ! कानांत बोटे का घालता राव ? मी तुमच्याशी बोलायला आलो आहे. माझा रंग आणि आवाज तुम्हांला आवडत नाही. न आवडू दे. चांगला रंग मिळणे किंवा चांगला आवाज मिळणे या गोष्टी दैवाधीन आहेत. कर्तृत्व दाखविणे मात्र प्रत्येकाच्या स्वाधीन आहे.

एकदा काय झाले ? उडता उडता मला लागली खूप तहान. खूप दूर नजर टाकली. पण कोठे दिसेना नदी का ओढा. अखेरीस एका घराच्या अंगणात एक कळशी दिसली. मला खूप आनंद वाटला. मी त्या कळशीजवळ गेलो. पण कळशीत पाणी होते तेथपर्यंत माझी चोच पोचेना. आता काय करावे ? मला समजेनासे झाले. इसापनीतीतल्या कोल्ह्याची आठवण. त्याने खूप उड्या मारल्या. पण त्याची द्राक्षापर्यंत

उडी पोचली नाही म्हणून तो म्हणाला, "इथली द्राक्षे आंबट आहेत. मला नकोच आहेत ती." मलाही वाटले की म्हणावे, "पाणी आहे खारट. मला नकोच ते !" पण तसे म्हणणे स्वतःचीच फसवणूक ठरली असती. मी ठरविले की, काहीही झाले तरी या कळशीतले पाणी प्यायचेच.

मी इकडे तिकडे बघितले. एका कोपऱ्यात मला बारीक दगडांचा ढीग दिसला. मी त्यातले बरेच खडे चोचीने उचलले व त्या कळशीत आणून टाकले. मी त्या पाण्यात चोच बुडवली. मनसोक्त पाणी प्यालो आणि भुर्रदिशी उडून गेलो.

तुमच्या समर्थ रामदासांनी सांगितले आहे ना –

केल्यानें होत आहे रे । आधीं केलेंच पाहिजे ।

त्याची मला प्रचीती आली. जयजय रघुवीर समर्थ !

■ ■

[illegible] वाचनालय [illegible]
अनुक्रमांक [illegible]
[illegible] नोंद दि. [illegible]

# तृष्णादेवीला नमस्कार असो !

**तृष्णे देवि नमस्तुभ्यं धैर्यविप्लवकारिणि ।**
**विष्णुस्त्रैलोक्यनाथोऽपि यत्त्वया वामनीकृतः ॥**

तृष्णेचा महिमा सुभाषितकारांनी अगाध म्हणून वर्णिला आहे. आपल्या आध्यात्मिक तत्त्वज्ञानात तृष्णा ही मोक्षापासून दूर नेणारी मानलेली आहे. सामान्य व्यवहारातसुद्धा कसल्याहि प्रकारची तहान ही माणसाला धैर्यापासून विचलित करणारी ठरते हे नव्याने सांगायला नको. राज्यतृष्णेने तर या जगात भयंकर अनर्थ ओढवलेले इतिहासात दिसतात. विष्णूसारख्या त्रैलोक्याचा स्वामी असलेल्या देवाला बुटक्या माणसाचे रूप या तृष्णेपायी – मग ती कोणत्याहि उदात्त हेतूने का असेना – घ्यावे लागले, म्हणून सुभाषितकार तृष्णादेवीला वंदन करतो आहे.

**तृष्णां चेह परित्यज्य को दरिद्रः क ईश्वरः ।**
**तस्याश्चेत्प्रसरो दत्तो दास्यं च शिरसि स्थितम् ॥**

अशी तृष्णेची महती गाऊन सुभाषितकार पुढे तिचे मोठे मार्मिक वर्णन करतो :

**मनोरथरथारूढं युक्तमिन्द्रियवाजिभिः ।**
**भ्रामत्येव जगत्कृत्स्नं तृष्णासारथिचोदितम् ॥**

मनोरथाच्या रथावर आरूढ झालेली, इंद्रियांचे घोडे जिच्या रथाला जोडले आहेत अशी तृष्णा नावाची ही सारथी साऱ्या जगाला सारखी फिरवीत ठेवीत असते.

# १. अगा जें झालेचि नाही

तहानकथांची सुरवात केली गजेंद्राच्या कथेने. भोजनकथांची सुरवात करू गजेंद्राच्या शत्रूच्या म्हणजे नक्राच्या कथेने.


"अहो इंद्रजितमहाराज ? आज तुमचा वाढदिवस ना ... मग निदान आज तरी लवकर उठा की." हे आईचे शब्द कानी पडताच मी खडबडून जागा झालो. आज माझ्या वाढदिवसानिमित्त आई एक खास पदार्थ करणार होती. माझ्या बाबांचा ( आईच्या भाषेत रावणमहाराज. आम्हा बापलेकांना झोपेचे अनिवार वेड. म्हणून आई आम्हांला अनुक्रमे कुंभकर्णाच्या भावाच्या व पुतण्याच्या नावाने हाका मारीत असते. ) एक कृष्णमुख नावाचा वानर बाबांचा मित्र आहे. तो वानर बाबांना नेहमी गोड गोड जांभळे भेट म्हणून देत असतो. काही दिवसांपूर्वी आई बाबांना म्हणाली, "अहो ! नेहमी गोड गोड जांभळे खाणाऱ्या वानराचे काळीज किती बरे गोड झाले असेल. आपल्या इंद्रजिताचा वाढदिवस जवळ आलाच आहे. तुम्ही त्याला मेजवानीच्या निमित्ताने आपल्या घरी बोलवा. आपण त्याचे काळीज खाऊन टाकू." प्रथम माझे बाबा कबूलच नव्हते. पण आईने जेव्हा माहेरी जाण्याचा धाक दाखवला तेव्हा ते झाले कबूल. आईने या खास मेजवानीसाठी आपल्या धाकट्या बहिणीलाही बोलावले होते आणि ती कालच येऊन दाखल झाली होती.

माझ्यानंतर आईने आपला मोर्चा बाबांकडे वळवला. दहा-पंधरा हाकांनंतर जागे होऊन बाबा खेकसले, "जरा कोठे मला झोप लागली न लागली की झाल्याच यांच्या हाका सुरू ... काय आहे रे पुंड्या

गडबड." खरे म्हणजे मी त्यांना हाका मारत नसून आईच त्यांना हाका मारत होती हे त्यांना पक्के माहीत होते. पण आईवर ओरडण्याची छाती होत नसल्याने, ते नेहमीच आईचा राग माझ्यावरच काढीत. आई म्हणाली, " उठा ... आणि तुमच्या माकडमित्राला लवकर घेऊन या." "पण मी म्हणतो ... आजच काय घाई आहे, पुंड्याचा वाढदिवस साजरा करायची ? उद्या बिद्या करू की."

पण असे बोलत असतानाच ते उठले होते. आम्ही पाण्यातच राहात असल्याने वेगळ्या स्नानाचा प्रश्नच नव्हता. थोडीशी न्याहारी करून आम्ही निघालो.

ते माकड आमचीच वाट पाहात होते. बाबांनी त्याला आपल्या पाठीवर घेतले व आम्ही परत आमच्या घरी निघालो. थोडेसे पुढे आल्यावर त्या माकडाने सहज प्रश्न केला, " मगरभाऊ ! आज मेजवानीला बोलावलेत खरे. पण आजचे मुख्य पक्वान्न कोणते ते नाही



सांगितलेत ... मी काही तरी उत्तर देणार होतो पण त्या माकडाने दिलेल्या जांभळांचा घास तोंडात असल्याने मला चटकन बोलता आले नाही. तेव्हा बाबाच म्हणाले, " कृष्णमुखा ! आता आपण ऐन

ग्र. क्र. ३९६१९ दो दि
दि. १७-८-९०



पाण्यात असल्यामुळे तुला सांगावयाला हरकत नाही. आम्ही सारेजण आज, जांभळे खाऊन खाऊन गोड झालेल्या तुझ्याच काळजावर ताव मारणार आहोत." यावर क्षणभर थांबून वानर म्हणाला, " अरेरे ! मगरभाऊ ... साराच घोटाळा झाला. आम्ही वानरे या झाडावरून त्या झाडावर उड्या मारणार. त्यात काळजाला धक्का लागण्याची भीती. म्हणून आम्ही आमची काळजे नेहमीच आपल्या घरी काढून ठेवत असतो. असाच वळ माघारी." आम्ही परत वळालो. किनाऱ्यावर येताच टुणकन् उडी मारून माकड खाली उतरले व झाडावर चढून म्हणाले, " रामराम ! मगरभाऊ ... तुमच्यासारख्या क्रूर प्राण्याशी मैत्री केली म्हणून मी मूर्ख व काळीज काढून ठेवले या माझ्या थापेवर विश्वास ठेवलात म्हणून तुम्ही मूर्ख. या आता."

मी आणि बाबा एकमेकांच्या तोंडाकडे बघतच राहिलो. अगदी जड पावलांनी आम्ही जेव्हा घरी परतलो तेव्हा आई व मावशी आमच्या स्वागताला तयारच होत्या. जेव्हा बाबांनी अडखळत अडखळत सारी हकीगत सांगितली तेव्हा काळीज शिजवण्यासाठी जमवलेला सारा मसाला त्यांच्या डोळ्यात उधळत आई कडाडली, " हात मूर्खांनो ! तुमच्या अकलेवर विश्वास ठेवणारी मीच अधिक मूर्ख आहे." फिदीफिदी हसत माझी मावशी म्हणाली, " बरं का ग ताई, प्राण्यांना आपले काळीज शरीराबाहेर काढून ठेवता येते की नाही, कोणास ठाऊक. पण काही प्राणी मात्र पृथ्वीवर येताना देवाघरीच डोके काढून ठेवून येतात एवढे मात्र मला आज बरीक पटले बरे. जाते मी आता. नाहीतर माझ्या घरचेही भोजन बुडून मी दोन्हीकडची उपाशी राहायची. येते रे पुंड्या ... वाढदिवस तुला सुखाचा जावो."

आणि बघता बघता मावशी निघूनही गेली. ती दिसेनाशी झाल्यावर माझ्या लक्षात आले की मावशीने माझ्यासाठी आणलेला

खाऊही ती बरोबरच घेऊन गेली. मी तसे म्हणताच रागावलेल्या आईने "खाऊ पाहिजे काय तुला? हा घे खाऊ." असे म्हणत आपल्या शेपटीने मला एक मोठा फटकारा मारला. मी भोकाडच पसरले. तेव्हा स्वतःची झालेली फजिती व अपमान विसरून बाबा ओरडले, "अग राक्षसिणी! किती जोराने मारलेस माझ्या बाळाला ... उगी उगी पुंड्या ..." तेव्हा दातओठ खात माझी आई किंचाळली, "रडतोय कुठला! नक्राश्रू ढाळतोय मेला ...!"

■ ■

# २. दाण्या-दाण्यावर लिहिले आहे

असे झाले (नाही) पुंडू मगराच्या वाढदिवसाचे भोजन. हिंदीत उगाच का म्हण आहे, दानेदानेपर लिखा है खानेवाले का नाम '...' (इंग्रजी तही कपात आणि ओठात खूपच अंतर असते अशी म्हण आहेच.) कृष्णमुख माकडाच्या काळजावर पुंडू व त्याच्या घरच्या लोकांचे नाव लिहिले नव्हते हेच खरे.

१८१४ सालच्या १८ फेब्रुवारीची गोष्ट. आमच्या नेपोलियन बादशहाचा पडता काळ सुरू झाला होता. आमचे साम्राज्य तर जवळ जवळ नष्टच झाले होते. आमच्या तीन-चार शत्रूंचे एकवटलेले सैन्य फ्रान्समध्ये घुसले होते. आम्ही त्यांना तोंड देत होतो. वर सांगितलेल्या दिवशी मी व माझा उदिनो नावाचा सहकारी सरदार मांटरु नावाच्या

गावाजवळ लढत होतो. आम्ही त्यांचा सडकून पराभव करून जवळ-जवळ पाच हजार लोक मारले. शत्रू पळू लागले. उदिनो मला म्हणाला, " म्याक्डोनाल्ड ! आपला पराक्रम ऐकून बादशहा खूष होईल नाही का ? चल आपण शत्रूचा पाठलाग करू. " शत्रूने इतक्या त्वरेने धूम ठोकली होती की आम्ही जेव्हा त्यांच्या शिबिरात पोचलो तेव्हा त्यांच्या जेवणघरात मेजांवर नुक्तीच वाढून ठेवलेली ताटे आम्हाला दिसली व त्यातील गरमागरम पक्कान्नातून वाफासुद्धा निघत होत्या. आम्ही त्या आयत्या पानांवर बसून त्या पक्कान्नावर आडवा हात मारला हे निराळे सांगायला का हवे ?

■ ■

## ३. मोहरा गमावला पण भोजन नाही गमावले !

---

मांटरूच्या लढाईत संयुक्तांचा पराभव झाला व त्यांना पळ काढावा लागला ही गोष्ट खरी. पण लढाई म्हटली की, कधी ना कधी पळ काढावा लागणारच. " सर्वच ठिकाणी घोडा फेकता येत नाही. कधी कधी ढाल फेकून पळून जाणे योग्य असते. " हे सादींचे वचन काही खोटे नाही, संयुक्तांच्या सेनेने मांटरूत तेच केले. पण लवकरच त्यांच्या प्रचंड बळापुढे नेपोलियनला हार खावीच लागली. वरील प्रसंगानंतर जवळ जवळ चार वर्षांनी म्हणजे २० फेब्रुवारी १८१८ साली महाराष्ट्रातील अष्टी गावाजवळ 'भोजनरत्न' रावबाजी पेशव्यांना पाठलाग करणाऱ्या इंग्रजांनी गाठले. आणि मग—

---

श्रीमंत भोजनास बसले होते. मी पाठीमागे उभा राहून त्यांना पंख्याने वारा घालीत होतो. तोच सेनापती बापू गोखले तेथे आले व हात जोडून म्हणाले, " श्रीमंत ! शत्रू अगदी जवळ आला आहे. याच क्षणी आपण येथून पळ काढला पाहिजे." त्यावर रुष्ट होऊन श्रीमंत म्हणाले, " बापू तुम्हांला दिसत नाही का आम्ही भोजन करीत आहोत ते ... आम्हाला जर निवांतपणे भोजन करता येत नसेल तर तुमच्या-सारख्या सेनापतींचा काय उपयोग ?" बापू गोखले क्षणभर चकितच झाले; पण पुनः हात जोडून नम्रपणे म्हणाले, " क्षमा करावी श्रीमंत. आपण स्वस्थपणे भोजन करावे. आम्ही शिकस्त करून शत्रूशी झुंजतो."

बापू गेले ते गेलेच. मोठे शौर्य दाखवून ते धारातीर्थी पडले. श्रीमंतांनी उत्तरेकडे पळ काढला.

■ ■

# ४. तेचि पुरुष भाग्याचे

बापू गोखल्यांसारख्या शूर आणि इमानी सेवकाला रावबाजींसारखा दुबळा स्वामी मिळाला ही दुर्दैवाची गोष्ट. पण सगळेच इमानी सेवक असे अभागी असत नाहीत. काहींना स्वामीही त्याच तोलाचा मिळतो. राणा प्रतापाला मोगलांच्या बळापुढे माघार पत्करून वनवासी व्हावे लागले. पण या रामाबरोबर कित्येक सरदारांनी स्वेच्छेने वनवास पत्करला. धर्मराजा युद्धातून पळत सुटला असता कर्णाने बाह्यतः त्यास धरण्याच्या उद्देशाने पण याच्या स्पर्शाने आपण पवित्र व्हावे अशी मनात इच्छा करून त्याच्या खांद्याला स्पर्श केला, असे महाभारतात वर्णन आहे.

या पराभूत धर्मराजाच्या सान्निध्याने पवित्र व्हावे अशी इच्छा मनात धरून मोगलांचा अंकित, नातलग-आधारस्तंभ असलेला राजा मानसिंग त्याला भेटण्यास आला. राणा प्रतापाने त्याचे योग्य ते आतिथ्य केले. पण त्याची सहभोजनाची विनंती मात्र साफ धुडकावून लावली. अवमानित मानसिंग वाढलेल्या ताटाला नमस्कार करून उठला व प्रतिशोधाची प्रतिज्ञा घेऊन निघाला. राणा प्रतापाने ते सारे अन्न तर अग्नीला अर्पण केलेच; पण सारी भांडीसुद्धा त्याने अग्नीत टाकून शुद्ध करून घेतली. जो मान मिळवण्यासाठी राजा मानसिंगाची तडफड चालली, तो मान राणा प्रतापाच्या सरदारांना प्रतिदिनी मिळतच होता. एकदा अकबराने आपला एक हेर राणा प्रतापाच्या हालचाली बघण्या-साठी पाठवला. त्या हेराला एक विलक्षणच दृश्य दिसले.

---

बादशहाच्या हुकमाप्रमाणे मी राणा प्रतापाचे मुक्कामावर तर जाऊन पोचलोच. ती वेळ दुपारची होती.

एका मोठ्या वृक्षाखाली राणाजी आपल्या सरदारांसह भोजन करीत होते. बसायला फक्त होती गवताची चटई. जाडेभरडेच अन्न होते. आणि पूर्वापार चालत आलेल्या रीतीप्रमाणे राणाजी त्या दिवशी विशेष पराक्रम दाखवणाऱ्या सरदारांच्या पानात आपल्या पानातील अन्न वाढीत होता. आणि तो 'दूना' तो सरदारही जणू आपण उदयपूरच्या राज-मंदिरात असून पंचपक्वान्नांचा 'दूना' मिळाला आहे, अशा आनंदात खात होता. तो प्रसंग पाहून तर माझे डोळे भरून आले. त्या सामं-ताचा हेवा करीतच मी तेथून काढता पाय घेतला.

■ ■

## ५. डँझिंग चॉकोलेट

लागोपाठ दोन कथांनी तुमच्या डोळ्यात पाणी उभे केले. अगदी गंभीर नाटकातसुद्धा मधून मधून हसवणारी दृश्ये घालावी लागतात. पुढची कथा मोठी गंमतीची आहे. बऱ्याच प्रयत्नांती नेपोलियनच्या लेफेरे नावाच्या सरदाराने पोलंडमधील डँझिगचा किल्ला सर केला. नेपोलियन लेफेरेवर फारच खूष झाला. त्याने लेफेरेला बोलावणे पाठवले. त्यावेळी काय घडले ते लेफेरेच सांगत आहे.

सम्राटांच्या निरोपाप्रमाणे मी त्यांच्या निवासस्थानी गेलो. त्यांनी मला आत बोलावले. मी आत जाताच त्यांनी म्हटले, "या डँझिंगचे ड्यूकसाहेब ... असे माझ्याजवळ या." मी घुटमळलो. तेथे तर भोजनाचा मोठाच थाट केला होता. पुष्कळ मोठमोठे सरदार तेथें आधीच आलेले होते. सम्राटांनी दाखवलेल्या जागेवर मीं जाऊन बसलो. "ड्यूकसाहेब—तुम्हाला चॉकोलेट फार आवडते असे मी ऐकले आहे!" मी मान डोलावून म्हटले, "होय सरकार." सम्राट म्हणाले, "आज भोजनात वाढण्यासाठी काही चॉकलेट आणलेले नाही. पण माझ्याजवळ एक लहानसा रत्तलभर पुडा आहे. तो तुम्हांला देतो. तो गोड मानून घ्या म्हणजे झाले. याला आपण डँझिंग चॉकोलेट म्हणू म्हणजे झाले." मी तो पुडा घेतला.

इतक्यात वाढपास सुरवात झाली. माझ्यापुढे जी मूद ठेवण्यात आली तिला हुबेहूब डँझिंगच्या किल्ल्याचा आकार दिला होता. सम्राट हसून म्हणाले, "ड्यूकसाहेब ... डँझिंगच्या किल्ल्यावर कसे तुटून पडलात ते दाखवा पाहू आम्हांला ..." सगळेजण खळखळून हसले.

आणि मोठ्या खेळीमेळीच्या वातावरणात आमचे भोजन आटोपले.

भोजनानंतर मी तो चॉकोलेटचा पुडा उघडला. त्यात चॉकोलेट नव्हते. तर एक लक्ष क्रौन किंमतीच्या हुंड्या गुंडाळलेल्या होत्या. कित्येक दिवस आमच्या सैन्यात पैशाला 'डँझिंग चॉकोलेट' असे म्हटले जात होते.

(पण दैवाचे फासे उलटसुलट पडून नेपोलियनला अखेरीस सेंट-हेलेना या खडकाळ बेटावर कैदी म्हणून राहावे लागले. त्याच्या रक्षक राष्ट्रांनी त्याला देण्याचे ठरवलेल्या तैनातीतही पुष्कळशी कपात केली. साहजिकच त्याची खर्चाची फार ओढाताण होऊ लागली. अखेरीस त्याने इंग्रजांना उद्देशून एक पत्र लिहिले :

"माझा खर्च भारी वाटत असेल तर मला एक दमडीही धाडू नका. तुम्ही माझ्या पहाऱ्यावर जी ५३ वी पलटण ठेवली आहे, तीमधील शूर शिपायांकडे जाऊन त्यांच्या पंक्तीत मी जेवणास बसेन. ते शिपाईगडी आहेत. मीही म्हातारा शूर शिपाई आहे. मला आपल्यात घ्यायला ते मुळीच मागेपुढे पाहणार नाहीत.)

■ ■

# ६. बोलाचाच पुलाव ! बोलाचेच मद्य

---

चॉकोलेट म्हणून दिलेल्या पुडक्यात हुंड्या घालून नेपोलियनने लेफेरेची गंमत केली. अरेबियन नाईटसमध्ये एका श्रीमंत माणसाने एका अतिथी-चीही जेवायला बोलावून जरा वेगळीच गंमत केली. ती त्या अतिथीच्या तोंडूनच ऐकलेली बरी.

---

मोठ्या इतमामाने त्या श्रीमंत गृहस्थाने मला आपल्या बैठकीत बोलावून घेतले व म्हणाला, "आपण दमला असाल नाही का? आधी सरबत मागवतो. त्याने टाळी वाजवून नोकराला सरबत आणायला फर्मावले. नोकर आला पण रिकाम्या हातानेच. मात्र त्याने धन्याच्या हातात सरबताचे प्याले द्यायचे नाटक केले. धन्याने माझ्या हातात एक प्याला द्यायचे नाटक केले. अर्थातच मीही सरबत घ्यायचे नाटक केले. जरा वेळाने धन्याने जेवणाची ताटे मागविण्याचे नाटक केले. मी त्या ताटातील पदार्थ खाण्याचे नाटक केले. मधून मधून मी एखाद्या पदार्थाची तोंड भरून स्तुती करी. धनी अर्थातच तो पदार्थ पुनः मागवण्याचे नाटक करी.

अखेरीस भोजन तर आटोपले. मग धन्याने द्राक्षे, अंजीर मागवली. तीही मी मिटक्या मारीत खाल्ली. नंतर धनी म्हणाला, "आता थोडे मद्य घेऊया." मी म्हटले "नको. नको. मला मद्याची फारशी आवड नाही." पण धनी आग्रहाने म्हणाला, "माझ्याकडे फार दुर्मिळ मद्ये आहेत. थोडीशी चव तर घ्या." असे म्हणून त्याने मद्य मागवण्याचा अभिनय केलाच. मग मीही मद्य पिण्याचा जोरदार अभिनय करून बेताल बडबड करायला सुरवात केली व बघता बघता यजमानाच्या तोंडात दिली भडकावून. तेव्हा इतका वेळ गंमत पाहणारे चाकर माझ्या अंगावर आले धावून. पण त्यांना रोखत यजमान म्हणाला, "वाहव्वा दोस्त! तुमने तो कमाल कर दी। हम बहोत खुष हुये हैं।" आणि मग मात्र त्याने मला खरीखुरी मेजवानी दिली.

■ ■

## ७. अन्न हेच परब्रह्म

तोंडात भडकावण्याची गोष्ट निघाली की साहजिकच होळकराच्या दिवाणाच्या तोंडात भडकावणारे थोरले माधवराव आठवतात. श्रीमंत अष्टौप्रहर राजकारण, न्याय याच्यातच मग्न असत. जेवतानासुद्धा याचा हात तोडण्याची तर त्याचा पाय तोडण्याची शिक्षा ऐकवणे चालूच असे. एकदा राघोबा त्यांना म्हणाले, "जेवताना तरी अशा अघोर शिक्षा देत जाऊ नकोस." थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दीतच अण्णा खाजगी-वाल्यांनी जेवताना थट्टा झाली म्हणून रागाने चांदीच्या फुलपात्राचा मुटका केला होता. रावसाहेबांनी तो मुटका आपल्या संग्रहालयात ठेवला होता ... तोंडात भडकावण्याची गोष्ट निघाली की, "जो कोणी तुझ्या उजव्या गालावर मारतो. त्याजपुढे दुसरा गाल कर." असा उपदेश करणारा येशू ख्रिस्तही आठवतो. [ खरे म्हणजे श्रीमुखात बसते ती उजव्या नव्हे डाव्या. कारण सामनेवाल्याच्या उजव्या हातासमोर आपला डावा गाल येत असतो ... येशूने उजव्या गालाचा उल्लेख आधी केला त्यावरून तत्कालीन यहुदी लोक डावखोरे होते की काय याचे संशोधन व्हावे. ] एकदा येशू आणि त्याची शिष्यमंडळी पद-यात्रेला निघाली.

---

आम्ही व आमचा गुरुजी येशू लोकांना उपदेश करायला निघालो. चालता चालता आम्हाला लागल्या भुका. आम्ही वाटेतल्या शेतातली कणसे मोडून खायला सुरवात केली. तोंडाने गजर चालला होता ख्रिस्ताचिया सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळी कोण आहे । तोच आमच्या गुरुजींचे द्वेष्टे टीकाकार[१] पुढे आले व म्हणाले, "अरे येशू ! आज

सब्बाथ (धार्मिक सुटीचा दिवस) ना. आज तर काहीही काम करायचे नसते. आणि तुझ्या शिष्यांनी तर खादीचा उद्योग आरंभला आहे." आमच्या हातातील कणसे तर गळूनच पडली. पण आमचा गुरू लेच्यापेच्या नव्हता. तो तत्परतेने म्हणाला, "अरे शंकेखोरांनो! तुम्ही जुना करार नीट वाचला नाही. आपला पूर्वज डेव्हिड राजा एकदा भूक लागली असता देवाच्या मंदिरात कसा गेला व तेथे नैवेद्याच्याच भाकऱ्या त्याने आपल्याबरोबरच्या माणसांबरोबर खाऊन टाकल्या हे नीट आठवा. भूक ही सर्वश्रेष्ठ नाही काय? शब्बाथासाठी माणूस नाही. माणसासाठी शब्बाथ आहे हे विसरू नका. टीकाकार निघून गेले. आम्ही दुप्पट उत्साहाने कणसे मोडून खाऊ लागलो.

■ ■

## ८. मनुष्य केवळ भाकरीवर जगत नसतो

पण ज्या येशूने आपल्या शिष्यांच्या खादीचे समर्थन केले त्याच येशूने मनुष्य केवळ भाकरीवर जगत नसतो ... असे म्हटले आहे.

अंगीकृत कार्यापुढे थोरांना भोजनाचीही फारशी शुद्ध नसते. मग एखादे डॉक्टर केतकर खिशात भज्यांची पुडी ठेवून वणवण करीत ज्ञानकोशाचा प्रचार करतात, तर एखादे वल्लभभाई गुजरातेतल्या जलप्रलयाचे वेळी दिवसभर तहानभूक विसरून जलग्रस्त भागात हिंडतात व त्यांचा शोध घ्यायला आलेल्या माणसाला दिसते की अहमदाबादेपासून दूर असलेल्या एका गिरणीच्या आवारात कंबरभर पाणी साठले आहे आणि त्यात उभे राहून हे पाटीलबोवा कुठूनतरी पैदा केलेली शिळीपाकी भजी खात उभे आहेत ...

अनेकदा तर तत्त्वपालनार्थ काहीजण अन्नत्याग करूनच देह-त्याग करतात. आयर्लंडमधील कॉर्क शहराचा महापौर टेरेन्स मॅकस्विनी यालापकडून इंग्रजांनी त्याच्यावर राजद्रोहाचा अभियोग भरला. त्याने तो धरला गेल्यापासूनच अन्नत्याग केला. सतत ७० दिवस अन्नत्याग करून तो देहमुक्त झाला. कोणीतरी त्याला विचारले, " अन्नत्याग केल्यापासून चार-पाच दिवसांनंतर तुझी अन्नावरची वासनाच उडाली असेल नाही ? " तेव्हा त्यास उत्तर मिळाले, " मला आतून अन्नाची इतकी इच्छा वाटत आहे की, चहाच्या एका कपाला मी एक हजार पौंड देईन. " आपल्याकडे यतींद्र-नाथांनीही असाच अन्नत्याग करून राष्ट्रकार्यार्थ देह ठेवला. दिल्ली कटात भाग घेतल्याच्या आरोपावरून बालमुकुंद या युवकावर इतर अनेक सहकाऱ्यांसह अभियोग भरण्यात आला. त्यात त्यांना फाशीची शिक्षा झाली. रामरखी नावाच्या मुली-बरोबर त्यांचा विवाह होऊन जेमतेम वर्षच झाले होते. रामरखीची कहाणी आर्य गॅझेटने तिच्याच शब्दांत वर्णन केली आहे.

---

पतिदेवांना कारागृहात खाट मिळत नाही, असे समजताच मीही खाटेवर झोपणे सोडून दिले. माझी मैत्रीण रागावून म्हणाली, " मरायचा का विचार आहे ? " मी विचारले, " काय, जे या रीतीने झोपतात ते " तेव्हा ती म्हणाली, " हो ! या तऱ्हेने झोपतात ते हटकून मरतात. माझ्या डोळ्यांतून अश्रू पडू लागले ... "

शेवटी मला त्यांना भेटण्याची अनुज्ञा मिळाली ... चौकशी केली तेव्हा ते म्हणाले, " आम्ही येथे एकदाच जेवतो " मी विचारले, " भाकरी कशी असते ? " त्यांनी माझ्या हातात भाकरीचा एक तुकडा दिला. तो तुकडा घेऊन मी घरी आले. तो तुकडा नीट पाहिल्यावर माझ्या ध्यानात आले की, त्यात हरभरे आहेत, गहू आहेत आणि

आणखीही काही पदार्थ आहेत. मी त्याच तऱ्हेची भाकरी बनवून खायला सुरवात केली. दिवसातून एकदा ती भाकरी खाऊन दुसऱ्यांदा केवळ पाणी पिऊनच राहात असे ...

हो ना करता करता त्यांची फाशीची शिक्षा कायम झाली. मी पुनः एकवार त्यांना भेटायला दिल्लीला गेले. त्यांची शिक्षा अंमलात आली आणि मी अन्नपाणी पार वर्ज्य केले. माझ्या व माझ्या पतिदेवाच्या चिरमीलनाची वेळ जवळ जवळ येऊ लागली होती.

( शेवटी तो दिवस उजाडला. आकाश निरभ्र होते. रामरखी उठली. स्वतःच पाणी आणून तिने स्नान केले. नवे वस्त्र नेसून ती पुनः पहिल्या जागी निजली. " प्राणनाथा ! फार दिवस परीक्षा घेतलीत. आता धीर नाही निघत. " असे म्हणतच तिने अखेरचा श्वास घेतला. )

■ ■

# ९. प्रेम लाभे प्रेमळाला

रामरखीची कथा ज्यांनी ज्यांनी वाचली असेल त्यांना त्यांना तिच्या अपार पतिभक्तीचे निश्चितच कौतुक वाटले असेल. आणि त्यात जे वाचक स्वर्ग न मानणारे असतील त्यांना त्या क्षणी तरी तीव्रतेने वाटले असेल की ... रामरखी आणि बालमुकुंद यांच्या पुनर्मीलनासाठी तरी स्वर्ग असायला हवा होता. असा स्वर्ग शब्दसृष्टीचे ईश्वर तरी निर्माण करू शकतात हे खास. बोकॅशियो या इटालियन लेखकाने अशाच एका नायकाच्या उत्कट प्रेमाचे फल त्यास कसे मिळाले ते दाखवणारी एक मोठी सुंदर कथा लिहिली आहे.

इटालीतल्या फ्लॉरेन्स शहरात फेडेरिगो नावाचा एक तरुण राहात होता. त्याचे गिव्होन्ना नावाच्या तरुणीवर प्रेम बसले. पण तिने त्याला कधीच प्रतिसाद दिला नाही. तिने दुसऱ्याच एका श्रीमंताशी विवाह केला.

गिव्होन्नाला संतुष्ट करण्याच्या प्रयत्नात फेडेरिगो आपली बरीचशी संपत्ती मात्र गमावून आता एका निर्जन ठिकाणी राहात होता. त्याला आता एकच विरंगुळा उरला होता. तो म्हणजे एक बहिरी ससाणा.

योगायोग असा की, गिव्होन्नाचा पती आपल्या एकुलत्या एका मुलासाठी भरपूर संपत्ती सोडून मरण पावला. आणि त्या मुलाच्या मनात फेडेरिगोजवळचा ससाणा भरला. त्या मुलाने त्या ससाण्याचा अगदी ध्यासच धरला. गिव्होन्नाला तर मोठेच संकट पडले. एकतर फेडेरिगोचे त्या ससाण्यावर असलेले प्रेम तिला ठाऊक होते. आणि दुसरी गोष्ट अशी की, ज्याच्याकडे आजपर्यंत दुर्लक्षच केले त्याच्या दारात जायची तिला लाजच वाटू लागली. पण अपत्यप्रेम मोठे विलक्षण असते. द्रोणाचार्यांसारखा मानधन विद्वान अश्वत्थाम्यासाठीच द्रुपदाकडे याचना करायला गेला. मोंगलांच्या हल्ल्यांना ज्याने जुमानले नाही तो राणा प्रताप वनात असता हातातील भाकरी रानबोक्याने पळवली म्हणून रडणाऱ्या मुलीकडे पाहून गहिवरला आणि त्याने अकबराकडे तहाचे बोलणे लावण्याचा विचार केला. गिव्होन्ना तर स्त्रीच होती. एका मैत्रिणीला घेऊन ती एका सकाळी फेडेरिगोच्या दारात उभी राहिलीच.

---

"मी फेडेरिगोकडे निघाले आहे. तू मला सोबत करशील काय?" असे गिव्होन्नाने मला म्हणताच मला आश्चर्याचा धक्काच बसला. पण तिने मुलाचा हट्ट सांगितल्यावर मी तिच्या बरोबर निघाले.

आम्ही त्याच्या झोपडीपाशी गेलो तेव्हा तो बागेत काम करीत होता. गिव्होन्ना आपल्या दारात उभी आहे, असे समजताच तो हातातले काम टाकून धावतच आला. आनंदाने त्याचा चेहरा अगदी फुलून निघाला होता. सुरवातीचे चार औपचारिक शब्द बोलल्यानंतर गिव्होन्ना त्याला म्हणाली, " फेडेरिगो ! आजपर्यंत तू माझ्यासाठी बरीच झीज सोसली आहेस. त्याबद्दल थोडे तरी उतराई व्हावे म्हणून मी आज तुला भेट द्यायला आले आहे. इतकेच नव्हे तर आज मी माझ्या या मैत्रिणीसह तुझ्याच घरी भोजन करणार आहोत. "

त्यावर तो म्हणाला, " बाईसाहेब ! आपण माझ्यावर केलेल्या या अनुग्रहाबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. " आणि आम्हाला दिवाणखान्यात बसायला सांगून तो घरात भोजनाची व्यवस्था करायला गेला.

त्याने दिलेले भोजन अगदीच साधे होते. पण त्याच्या अदबीच्या वागणुकीमुळे आम्हाला ते जेवण मोठे रुचकर लागले.

भोजनानंतर गिव्होन्नाने आपण काय हेतूने आलो आहोत ते सांगितले. आणि तिची मागणी ऐकताच तो हुंदकेच देऊ लागला. गिव्होन्ना म्हणाली, " तो ससाणा आपणास खूप आवडतो हे मला माहीत होते. पण ते प्रेम इतके तीव्र असेल हे नव्हते मला ठाऊक. तुमच्या भावना दुखावल्याबद्दल क्षमा करा मला. तो ससाणा तुमच्याकडेच राहू द्या. मी मुलाची कशीबशी समजूत घालीन. " त्यावर हुंदके थांबवून फेडेरिगो म्हणाला, " बाईसाहेब ! दैव आपल्या प्राप्तीच्या बाबतीत माझ्याशी आतापर्यंत अत्यंत क्रौर्यानेच वागत आले आहे. पण आज दैवाने दाखवलेल्या दुष्टपणाला सीमाच उरलेली नाही. आपण माझ्या गरिबाच्या घरी पायधूळ झाडून भोजन करायचाही मनोदय व्यक्त केलात. पण माझ्या या दरिद्री घरात तुमच्यापुढे ठेवावा असा चांगला

खाद्यपदार्थंच शिल्लक नव्हता. मी स्वतःच्या फुटक्या नशिबावर खूपच चडफडलो. आणि त्याच वेळी माझी माझ्या लाडक्या बहिरी ससाण्यावर



दृष्टी पडली. आणि मला हर्षवायूच व्हायची वेळ आली. मी मागचा-पुढचा विचार न करता त्याची मान मुरगाळून त्यास आचाऱ्याच्या हातीं देत म्हटले, "याचेच मांस शिजव." आपण आता जे भोजन केलेत ते त्याच ससाण्याच्या मांसाचे.'

माझे आणि गिव्होन्नाचे डोळे या अपूर्व त्यागाने विस्फारले गेले. घरी परतताना गिव्होन्ना म्हणाली, "माझ्यासारखी भाग्यवती मीच."



■ ■

# १०. अखंड उपवासी

मागच्या गोष्टीत ससाण्याला हुतात्म्याची गती लाभली आहे. पण आपल्या पुराणात तर ससाण्याचे भक्ष्य वाचवण्यासाठी स्वतःच त्याचे भक्ष्य होणाऱ्या शिबि राजाची गोष्ट आली आहे. तो ससाणा दुसरा तिसरा कोणी नसून शिबीचे सत्त्व पाहायला आलेला इंद्रच होता. पुराणात अशा सत्त्वपरीक्षेच्या कितीतरी कथा आहेत. सत्त्वपरीक्षा घेणाऱ्यातला सर्वांत कडक परीक्षक म्हणजे दुर्वास ऋषी. दुर्वासाचे नेहमीचे मागणे एकच. जेवायला वाढा ... रामाजवळही हेच मागणे. पांडवांजवळही हेच मागणे. एकदा अशाच काही निमित्ताने कृष्णाने यमुनेपलीकडे असलेल्या दुर्वासांना भोजन नेऊन द्या, अशी काही गोपींना आज्ञा केली. त्या वेळी एक गोपी कृष्णाला म्हणाली, " नदी तर दुथडी वाहात आहे." कृष्णाने योगबलाने नदीचे पाणी दुभंगवले ...

कृष्णाने नदी दुभंगवताच आम्ही पैलतीरावर गेलो. प्रत्येकीच्या हातात सुग्रास भोजनाने भरलेले ताट होतेच. आम्हाला वाटले होते की – एका ताटाचा समाचार घेऊन बाकीची ताटे आम्हालाच प्रसाद म्हणून खायला सांगतील हे मुनिवर्य. पण कसचे काय आणि कसचे काय ... एक एक करून त्यांनी सारी ताटे केली की फस्त ! आम्ही पाहातच राहिलो. हा दुर्वास मुनीच आहे का त्याचे रूप धारण केलेला खादाड बकासुर आहे हेच समजेना. शेवटचे ताट संपवल्यावर मुनिवर्य म्हणाले, " मी कृष्णाला सांगितले होते की, गोकुळातल्या सर्व गोपींना अन्न घेऊन पाठव. पण त्याने फारच थोड्या गोपींना धाडलेले दिसते." मी हात जोडून म्हटले, " मुनिवर्य ! गोकुळातल्या झाडून

साऱ्या गोपी आपणास अन्न घेऊन आल्या आहेत." त्यावर डोळे किलकिले करून ते म्हणाले, "बस्स ... इतक्याच गोपी गोकुळात आहेत? असो. आता तुम्ही जा." त्यावर मी येताना कृष्णाला टाकलेलाच प्रश्न दुर्वासांना टाकला, "पण महाराज! नदी तर दुथडी वाहात आहे." "ऊः नदीची काय तमा!" असे म्हणत त्यांनी हातात जल घेतले व म्हटले, "मी जर आजन्म उपवासी असेन तर ही नदी दुभंगो." आणि काय आश्चर्य! नदी पुनः दुभंगली. आम्ही आश्चर्याने थक्कच झालो. आणि काही न बोलता नदीच्या पात्रातून गोकुळात गेलो.

■ ■

# ११. तेचि श्वान भाग्याचे

आपल्याकडे आलेल्या अनाहूत प्रेयसीला काय भोजन द्यावे हा फेडेरिगोला प्रश्न पडला होता ... तर आपल्याकडे आलेल्या अतिथीला – बाल संभाजीला कसे वाचवावे हा प्रश्न मथुरेत राहणाऱ्या कृष्णाजीपंतांना पडला होता. शोध करायला आलेल्या मुसलमान शिपायांची दिशाभूल व्हावी म्हणून ते म्हणाले, "हा माझा भाचा आहे." आणि त्याची सत्यता पटविण्यासाठी त्याला आपल्या ताटात जेवायलाही लावले आहे. आपल्या हातातील भाकरी कुत्र्याने पळवताच कोरडी भाकरी खाऊन कुत्र्याचे पोट दुखेल या शंकेने व्याकूळ होऊन बाल नामदेव त्याच्यामागे तुपाची वाटी घेऊन धावले आहेत. अशाच एका भुकेलेल्या कुत्र्याची ही भोजन-कथा. कथा सांगत आहेत चर्चिल यांच्या पत्नी क्लेमेंटाईन.

१९४३ सालचा डिसेंबर महिना होता. माझे पती विन्स्टन बरेच आजारी होते व आम्ही मॅरॅकेश या गावी जाऊन राहिलो होतो. चांगले मित्रमंडळ, चांगले अन्न, चांगले सहलीचे ठिकाण. हेच विन्स्टनला योग्य औषध आहे, याबद्दल माझी हा वेळपर्यंत अगदी खात्री झाली होती. अशा सहलींच्या वेळी मी बरोबर भरपूर खाद्यपदार्थ घेत असे. पण या विशिष्ट प्रसंगी मात्र माझे सारेच पाहुणे जवळजवळ अर्धपोटीच राहिले ! ... त्याचे असे झाले :

आम्ही चटयांवर बसलो न बसलो तोच भुकेने अत्यंत वखवखलेला एक अल्सेशियन कुत्रा तेथे आला आणि आमच्या भोवती घुटमळू लागला. तो मध्येच भुंकायचा. मध्येच पोटावर सरपटायचा ... अत्यंत सावधगिरीने तो पुढे पुढे सरकत होता.

आमचे सर्वांचेच लक्ष त्याच्याकडे वेधले गेले. गंमत म्हणून विन्स्टनने त्याच्यापुढे एक तुकडा फेकला. त्याने तो क्षणाचाही विलंब न लावता गट्टम् केला. विन्स्टनने खाणे थांबवले. त्याचे सर्व लक्ष या कुत्र्यावरच खिळले. तो तुकड्यामागून तुकडा फेकू लागला आणि तो कुत्रा तत्परतेने तुकडा न् तुकडा खाऊ लागला. पाहाता पाहाता खाद्यपदार्थांने भरलेली सारी टोपली रिकामी झाली. आम्हाला कोणाला काहीच उरले नाही. पण श्वानराज मात्र खुषीत आले होते. सरतेशेवटी त्यास विश्वास पटून तो हळू हळू विन्स्टनच्या अगदी जवळ आला आणि त्याच्या बाहूंमध्ये पूर्णतया विसावला.

■ ■

# १२. अमृतासमान भाकर

चर्चिल यांच्या मेळाव्यातील इतर लोक भुकेले राहिले ते राहिलेच त्या दिवशी. आपण निमंत्रितांची गैरसोय केली हे चर्चिल महाशयांच्या गावीही नसेल. उलट आपण त्यांना एक नवीनच गंमत दाखवली याचाच अभिमान त्यांना वाटला असेल. पण सर्वच यजमान आमंत्रित पाहुण्यांविषयी इतके निष्काळजी राहात नाहीत. काही काही तर आमंत्रितांची नको तितकी काळजी वाहतात. कविवर्य माधव ज्यूलियन यांचा समावेश या अखेरच्या वर्गात केला पाहिजे.

कविवर्यांनी एकदा बऱ्याच साहित्यिक मित्रांसाठी आपल्या घरी एका रात्री एक मोठा भोजनसमारंभ आयोजित केला. पण दुर्दैवाने आदल्याच रात्री ज्ञानकोशकार केतकरांचे निधन झाले. आणि बहुतेक आमंत्रितांचा सारा दिवस डॉक्टरांच्या अंत्यविधी-समारंभातच गेला. पण कविवर्य माधव ज्यूलियनांसमोर हॅम्लेटला पडली तशी समस्या उभी राहिली, ' भोजन-समारंभ पार पाडावा का रद्द करावा ? ' अखेरीस त्यांनी सर्व साहित्यिकांना ' अंत्यविधी आटोपून भोजनास या. ' असा निरोप दिला. साराच प्रकार चमत्कारिक होता. सामान्यतः मृत्यू आणि जीवन यांची अशा काही प्रसंगाने समोरासमोर गाठ पडते तेव्हा जीवन मृत्यूची बूज राखण्यासाठी दोन पावले मागे सरत असते. गणपती-उत्सवात एका आळीत हिराबाईंचा गायनाचा कार्यक्रम ठरला असता त्याच दिवशी त्या आळीत एक मृत्यू घडून आला. त्यावेळी त्या रात्रीचा गाण्याचा कार्यक्रम रहित केला होता. पण या ठिकाणी जीवनाने दोन पावले माघार घ्यायचे नाकारले. माधव ज्यूलियन त्या प्रसंगी

म्हणाले, "काही हरकत नाही. मी केले ते वावगे नाही. डॉ. केतकरांनीही असेच केले असते."

अनेकांना या प्रसंगी औचित्यभंग झाल्यासारखे वाटेल. पण माधव ज्यूलियनांच्याच शब्दात बोलायचे तर "थांबला तो संपला!"

■ ■

# १३. अमृतस्वामीगौरवम्

आल्पस् पर्वताच्या अवघड रस्त्यातून नेपोलियन सेना नेत असताना त्याचे अनेक स्वार पाय घसरून दरीत पडत. नेपोलियन त्यांच्यासाठी हळहळणाऱ्या सैनिकांना सांगे, "पडला तो पडला. हळहळत राहाल तर तुम्हीही पडाल. आगे बढो." आपल्या पूर्वजांनीही मृतो मा अमृतं गमय। असा संदेश दिलाच होता ना ... जो मृत्यूच्या समीप जाऊन वाचतो त्याला जीवनाचे मूल्य अधिक कळते, नाही का? म्हणूनच पानपतच्या घोर संग्रामातून वाचलेले नाना फडणीस म्हणतात, "सोळा सतरा कोश अन्न उदकाव्यतिरिक्त आलो. क्षुधा तिसरे प्रहरी लागली तेव्हा बोरीचा पाला सापडला. तो खाऊन पाहिला. तो तोंडात जाईना. तसाच संध्याकाळी एका ग्रामाबाहेर आलो, तो एका बैराग्याने पीठ आणून दिले. त्याची भाकर खाल्ली. ती अमृत-समान लागली."

नेपोलियनच्या सुरवातीच्या लढाया इटालीत झाल्या. त्यात नेपोलियनला वूर्मझर नावाचा सामनेवाला सेनापती फारच कठीण भेटला. सहा दिवसांत तर त्याला अंगावरचे कपडे बदलता आले नाहीत की झोप मिळाली नाही. मांचुआ नामक ठिकाणाजवळ तर त्याचे फारच हाल झाले. एकदा भुकेने व्याकूळ होऊन तो घोड्यावरून चालला असता त्याला त्याचा एक शिपाई न्याहारी करताना आढळला.

मी भाकरतुकडा खात असतानाच सरदार नेपोलियन तेथे आले. भाकरी पाहून ते घोड्यावरून खालीच उतरले ... आणि त्यांनी म्हटले, "बघू या हो, तुमच्या जवळील भाकरीची चव." मी मोठ्या आनंदाने त्यांना माझ्या भोजनात सहभागी करून घेतले. "वाः काय चविष्ट आहे ही भाकरी. पॅरिसमधल्या मेवेवाल्यांची मिठाई या भाकरीपुढे किस झाडकी पत्ती." असे म्हणत स्वारीने माझ्याजवळचे पाणीही घटाघटा पिऊन टाकले व माझ्या अभिवादनाचा स्वीकार करून त्यांनी पुनः घोड्यावर उडी घेतली. पुढे बादशहा झाल्यानंतर नेपोलियन महाराजांनी ही गोष्ट आठवून माझी चांगली व्यवस्था लावून दिली.

■ ■

# १४. कुऱ्याचा हेवा वाटला !

नेपोलियनने तोंडदेखली भाकरीची स्तुती केली असेल असे म्हणता येणार नाही. ज्याला काही राष्ट्रकार्य साधायचे आहे, त्याने मिष्टान्नापासून दोन हात दूरच राहिले पाहिजे असे ज्युलियस सीझर या प्रख्यात रोमन सेनापतीचे म्हणणे होते. तत्कालीन बड्या रोमन लोकांनी जगातले मिष्ट पदार्थांचे बाजार पार काबीज केले होते. म्हणून सीझरने त्याबाबत कडक नियम केले व त्यानुसार अनेकदा त्याचे कामदार मोठमोठ्या जेवणावळीत घुसून यजमान व पाहुणे यांच्यापुढची मिष्टान्नाची ताटे खुशाल उचलून नेत ... कोठल्याशा प्रसंगी लो. टिळकसुद्धा म्हणाले होते की, "ज्याला राष्ट्रकार्याची इच्छा आहे, त्याने मिळत असले तरी सुग्रास पदार्थ टाळून कदान्नाची सवय लावून घेतली पाहिजे."

पुढे दिलेली सत्यकथा प्रस्तुत लेखकाच्या एका राजस्थानी मित्राच्या आयुष्यात घडलेली आहे.

---

वडिलांचे अकाली निधन झाले. क्षेत्राचे ठिकाणी उरलेले विधी करण्यासाठी आईल घेऊन गेलो. घरची स्थिती बेताचीच होती. परत येताना तिकिटे काढून झाल्यावर माझ्याकडे फारच थोडे पैसे शिल्लक राहिले. प्रवास लांबचा होता. दुपारच्या वेळी आगगाडी एका संगम-स्थानकावर उभी राहिली. मी खाली उतरलो. जवळच्या पैशातून पुरी-भाजी विकत घेतली. पण ती जेमतेम एकाच माणसाला पुरेल एवढी होती. ती सारीच्या सारी आईच्या हातात देत मी म्हणालो, " मी स्टॉलवरच पुरीभाजी खाल्ली आहे. "

आईने जेमतेम दोन पुऱ्या खाल्ल्या. दुःखभाराने तिला आणखी एक घाससुद्धा जाईना. त्याच वेळी एक मरतुकडे कुत्रे फलाटावरून चालले होते. आईने यू – यू करून त्याला जवळ बोलाविले व चटकन त्या कुत्र्यासमोर ते सारे जिन्नस टाकले. हा हा म्हणता त्या कुत्र्याने त्या पुऱ्या व भाजी पार फस्त करून टाकली. मी मात्र तशा दुःखातही त्या कुत्र्याकडे थोड्याशा मत्सरानेच पाहत राहिलो, हे कबूल करायला मला मुळीच लाज वाटत नाही.

■ ■

## १५. आपद्धर्म

ॐ भूर्भुवः स्वः । ॐ तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमही । धियो योनः प्रचोदयात् ।' हा तेजस्वी मंत्र अनेकदा तुम्ही ऐकला असेल. या मंत्राचे जनक होते विश्वामित्र ऋषी. एकदा मोठा दुष्काळ पडला ...

कित्येक शतकात पडला नव्हता असा दुष्काळ पडला. सर्वत्र हाहाकार उडाला. लोक देशोधडीला लागले. पण हा दुष्काळ एकाच देशात पडला होता असे थोडेच होते ? सगळीकडे तीच स्थिती. कोणी कोणाकडे जाणे आणि एकादशीने शिवरात्रीकडे जाणे सारखेच होते. तरीसुद्धा जीवाशा मोठी चिवट असते. अन्नासाठी दाहीदिशा माणसे हिंडतच राहिली. मीही त्यातलाच एक होतो.

अखेरीस एका रिकाम्या झोपडीत मला कुत्र्याची एक तंगडी सापडली. ती हातात घेऊन मी तिच्याकडे पाहातच राहिलो. आजपर्यंत कुत्र्याचे मांस कोणीच मानवाने खाल्ले नव्हते. त्यातून मी तर होतो विश्वामित्र ... गायत्री मंत्राचा जनक ... मी जरी निर्जन स्थानी होतो, तरी ते निषिद्ध मांसभक्षण सर्वेपकर्णी व्हायला वेळ लागला नसता. कारण वाईट वार्ता ही वाऱ्यासारखीच पसरत असते. जगाच्या अंतापर्यंत माणसे म्हणत राहणार होती ... विश्वामित्राने कुत्र्याची तंगडी खाल्ली ... त्यापेक्षा भुकेने व्याकूळ होऊन आजच प्राणत्याग केलेला काय वाईट ? कारण आज जरी भूक भागली तरी उद्याचे काय ? अशा उलट-सुलट विचारात मी कितीतरी वेळ घालवला. आणि सरते-शेवटी उद्याचे उद्या ... आजचा दिवस तर भूक भागवू ... असे म्हणत मी ती तंगडी तोंडात घातली. आपद्धर्म म्हणून !

■ ■

## १६. भूक न म्हणे हा भूपती –

नुकतेच निधन पावलेले ड्यूक ऑफ विंडसर (इंग्लंडचे माजी राजे ८ वे एडवर्ड.) हे लहानपणी नौदलात शिकत होते. तेथील छात्रालयातील अन्नाचा त्यांना अगदी कंटाळा आला. बरे बाहेरून पदार्थ घेऊन खावेत तर जवळचे पैसे संपलेले. अशा स्थितीत छोट्या डेव्हिडने (त्याला प्रामुख्याने डेव्हिड असेच म्हटले जाई.) एक युक्ती योजली. आजारी पडल्याचे सोंग करून त्याने रुग्णालयात प्रवेश मिळवला. तेथली आयरिश मेट्रन हुशार होती. तिने हे आजारीपणाचे सोंग ओळखले.)

---

मेट्रनबाई तर माझ्यावर एकदम गरम झाली व मला तेथून घालवून देण्याचा विचार करू लागली. पण मी एकदम ओक्साबोक्सी रडू लागलो आणि गयावया करीत तिला म्हणालो, "मला दुसरे तिसरे काही नको. काही तरी चांगले चुंगले खायला हवे." "पुनः असे काही करशील तर खबरदार." असे धमकावीत तिने मला आपल्या स्वयंपाकघरात नेले आणि भरपूर चहा, लोणी फासलेले अंडी, ताजा पाव आणि मुरांबा दिला. तिचे आभार मानीतच मी तेथून काढता पाय घेतला.

(ही कथा ८-१०-७२ च्या केसरीत आली आहे.)

■ ■

# १७. मी भाकरी चोरल्या नाहींत

Guilty or not guilty या नावाची एक इंग्रजी कविता आहे. स्थल आहे एक न्यायालय. आरोपी आहे १५-१६ वर्षांची मुलगी. माझ्या-समोर आरोपी म्हणून उभी असलेली मुलगी अवघी १६ वर्षांची होती. ती अगदी केविलवाणी दिसत होती. वर्षानुवर्षे तिला हाल सोसावे लागत होते हे उघडच दिसत होते ... तिच्यावर आरोप होता एका खाणावळी-तून रोट्या चोरल्याचा.

मी तिला म्हटले, " तू तर गरीब दिसतेस. तुझ्या हातून असला गुन्हा घडला नाही असे मला वाटते. पण आपले निर्दोषित्व सिद्ध करायची कामगिरी मात्र तुलाच करावी लागेल हं. "

तिने एकदम रडायलाच सुरुवात केली. मग ती हळूहळू म्हणाली, " साहेब ! आम्हा भावंडांत मी थोरली. देवाने आईला आणि बाबांना दोघांनाही आपल्याकडे नेले. प्रथम प्रथम मी सटरफटर कामे मिळवून पैसा मिळवी. पण पुढे तीही कामे मिळेनाशी झाली. थंडी तर मी म्हणू लागली आणि माझा धाकटा भाऊ व बहिणी यांनी तर ' ताई आम्हांला भूक लागली . . . ताई आम्हांला भूक लागली . . . ' असा नुसता गजर लावला ... मग मी काय करणार ? गेले खानावळीत आणि उचलल्या तीन भाकरी ... त्याला काय चोरी म्हणणार आपण ? "

न्यायालयात असलेल्या प्रत्येकाने आपापल्या डोळ्यांना रुमाल लावला ... अनेकांनी भराभर पैसे द्यायला सुरवात केली. आजपर्यंत मी कितीतरी कठीण प्रकरणे सोडवली होती. पण या प्रकरणाने मात्र माझी मती अगदी गुंग होऊन गेली होती. मी एवढेच म्हटले, " या

चिमण्या कैद्याला शिक्षा काय द्यायची ते पुढे बघू." आणि न्यायासनावरून खाली उतरून मी त्या बालिकेचा हात धरून तिला म्हटले, "चल माझ्या घरी."

■ ■

## १८. अन्नाचा साठा केवळ ११ मैलावर

'दक्षिण ध्रुवावर माझ्या राष्ट्राचा झेंडा मी इतर राष्ट्रांचे आधी लावीन' अशा ईर्षेने इंग्लंडचा रॉबर्ट स्कॉट हा संशोधक निघाला. अवघे बेचाळीस वर्षांचे वय. पण ज्यावेळी अनेक संकटांना तोंड देत तो दक्षिण ध्रुवावर पोचला तेव्हा त्याला तेथे नॉर्वेच्या ॲम्युन्सेनने आपल्या राष्ट्राचा झेंडा आधीच लावलेला आढळला. पहिलेपणाचा मान हुकला. स्कॉटला अर्थातच थोडी खंत वाटली. पण इलाज नव्हता. १९ जानेवारी १९१२ ला परतीचा प्रवास सुरू झाला. सर्वजण दमून गेले होते. वाटेत ठिकाठिकाणी ठेवलेले अन्नाचे साठे नष्ट झाल्याचे त्याला आढळले.

२१ मार्चपर्यंत आम्ही फक्त २० मैलांची चाल करू शकलो होतो. अन्नाचे साठे होते ते लांब राहिले होते. "हिमवती दिव्यौषधयः शीर्षे सर्पः समाविष्टः!" असे म्हटले आहे (विशाखदत्त) ते खरे वाटले. साऱ्याच योजना फसल्या होत्या. हिशेबाने आणलेले अन्न कसे पुरवायचे हा यक्ष प्रश्न आमच्या पुढे येऊन पडला होता. सर्वजण भुकेने व्याकूळ झालो होतो. सारेच आजाराने, व्याधीने पीडलेले. अजून ११ मैल चालू शकलो असतो तर तेथला अन्नाचा साठा आमच्या उपयोगी

पडला असता. पण भोवतालचे भीषण वादळ, आणि आम्ही सारे गलितगात्र झालेलो. आता आम्ही अकरा इंच सुद्धा प्रगती करू शकणार नाही. आमचा शेवट ठरलेला आहे. मी जे हे लिहून ठेवीत आहे, ते केवळ इंग्रज माणूस किती धैर्याने साहस करतो व केवढ्या मनोधैर्याने मृत्यूस तोंड देतो हे जगास कळावे म्हणूनच. आम्ही परमेश्वरी इच्छा प्रमाण मानतो. नमस्कार.

■ ■

# १९. श्राद्ध : विकतचे आणि फुकटचे

रविबाबूंना आला त्याच प्रकारचा अनुभव १८९६-९७ च्या सुमारास कै. शिवरामपंत परांजपे आणि कै. तात्यासाहेब केळकर यांना आला. लो. टिळकांनी दुष्काळनिवारणाची चळवळ सुरू केली होती. एकदा या चळवळीतून उद्‌भवलेल्या एका अभियोगासाठी लो. टिळक, परांजपे आणि केळकर प्रभृती मंडळी पेणला गेली असता त्यांना कल्याण-जवळील टिटवाळा या गावातून एक पत्र आले, 'सभेची तयारी आहे. ठिकठिकाणचे लोक येणार आहेत.'

लोकमान्य मला व शिवरामपंतांना म्हणाले, "मला तर वेळ नाही. तुम्ही दोघेच जाऊन या." आम्ही निघालो व टिटवाळ्याला सकाळी १० वाजता पोचलो. स्थानकावर आमच्या स्वागतार्थ चिटपाखरूसुद्धा नव्हते. बैलगाडी करून आम्ही गावात गेलो. पण जायचे कोणाकडे ? हा प्रश्न पडला. शेवटी गाडीवाल्याला म्हटले, "येथे

कोणी शाळामास्तर असतील, त्यांच्याकडे घेऊन चल." मास्तर घरीच होते. त्यांनी आम्हाला घरात घेतले व एका खोलीत बसवून ठेवले. चहाचासुद्धा आग्रह झाला नाही.

बारा वाजले तरी यजमान म्हणेनात, "चला जेवायला." मास्तर काहीच बोलेनात, म्हणून आम्हीच तोंड उघडून येण्याचे कारण सांगून आमचा परिचय करून दिला. त्यांना आनंद तर अवश्य वाटला असेल, पण ते स्वतः सरकारी नोकर असल्याने सरकारद्रोही माणसांचा सत्कार कसा करावा ... हाच त्यांना प्रश्न पडला. पण अखेरीस ते म्हणाले खरे, "आपण आता येथेच राहा ... पण गावात सभा असल्याचे माझ्या तरी कानी पडले नाही. आज माझ्या घरी श्राद्ध आहे. ब्राह्मणांची वाट पाहात आहे. ते आले की चार वाजता भोजन होईल. आपण मग नंतरच्या गाडीने परत जावे."

श्राद्धाच्या दिवशी जेवणापूर्वी कोणी काही खात नसल्याने यजमान आम्हास 'काही खा' असे म्हणेनात. आमची स्नाने आटोपली तरी ब्राह्मणांचा पत्ता नव्हता. तेव्हा शिवरामपंत हळूच त्यांना म्हणाले, "आम्ही गृहस्थ असलो तरी तुमची अडचण जाणून आम्हीच तुमच्याकडचा विधी पार पाडतो."

पण तेवढ्यात ब्राह्मण आले. ते आपले काम करू लागले. आम्ही रिकाम्या पोटी चांगली दोन अडीच तास झोप काढली. साडेतीनला अपेक्षित शब्द कानावर पडले, "पाने वाढलीं आहेत." आम्ही मोठ्या लगबगीने उठलो आणि पानावर बसलो ...

भोजनानंतर यजमानांचा निरोप घेऊन बाहेर पडलो गावाबाहेर पडल्यावर एका माणसाने धावत येऊन आमची गाडी थांबवली व आम्हाला साष्टांग नमस्कार करून तोंडात मारून घ्यायला सुरुवात केली. आम्ही त्यास शांत केल्यावर तो म्हणाला, "मीच ते निमंत्रण धाडले

होते. पण ते कळताच गावकरी भ्यायले. माझ्यावर बहिष्कार घालून सारे दूर निघून गेले. मला क्षमा करा. ''

वक्रोक्तीचा मूर्तिमंत अवतार असलेल्या शिवरामपंतांनी त्या माणसाची गोड गोड बोलून समजूत काढली आणि अखेर आम्ही मार्गाला लागलो.

■ ■

## २०. प्रतिशोध म्हणजे देवांचा आनंद

Vengence is the joy of Gods ... अशी एक इटालीयन म्हण आहे. अलेक्झँडर ड्यूमास या फ्रेंच कादंबरीकाराने Count of Monte Cristo ही एक अत्यंत सुंदर कादंबरी लिहिली आहे. तिचा नायक आहे एडमंड डाँटे नावाचा एक साधाभोळा खलाशी. त्याचा विवाह लागत असतानाच त्याला राजद्रोहाच्या आरोपावरून पकडण्यात येते. त्याचाच मित्र म्हणवणाऱ्यांकडून निनावी पत्रद्वारे हा आरोप केला गेलेला असतो. एडमंडला जवळ जवळ चौदा वर्षे एका भयंकर तुरुंगात काढावी लागतात. तेथून तो मोठ्या धाडसाने निसटतो व आपल्या वडिलांची चौकशी कॅडेरो नावाच्या शेजाऱ्याकडे करू लागतो ... अर्थातच डाँटेने त्या वेळी दुसरेच नाव धारण केलेले असते.

'' महाराज ! आपण म्हणता त्या वृद्ध डाँटेचा मुलाच्या अटकेनंतर वर्षाच्या आतच मोठ्या हृदयद्रावक रीतीने अंत झाला. त्या मानी मनाच्या माणसाने मदतीसाठी कोणापुढे हात पसरला असेल तर शपथ ! हळूहळू त्याने घरातले सारे सामान विकून टाकले. विकायला काहीच उरले नाही तेव्हा अर्थातच त्याची उपासमार सुरू झाली. मी एडमंड डाँटेच्या

मालकांना बोलावले. त्यांनी डॉक्टर आणला. डॉक्टर म्हणाला, "यांना पोटाचा विकार झाला आहे. अन्न अगदी कमी प्रमाणातच द्या." ते ऐकताच वृद्ध डाँटेच्या चेहऱ्यावर हास्य उमटले. त्यांची प्रार्थना देवानेच ऐकली होती तर. नवव्या दिवशीच त्यांनी देह सोडला ... महाराज ! तुम्ही विचारता वृद्ध डाँटेंना कसा मृत्यू आला ? भूक ... ! महाराज ! भुकेने तडफडूनच वृद्ध डाँटे मरण पावले बरे – "

एडमंड डाँटेने आपला विश्वासघात करणाऱ्यांचा पुरता सूड उगवला. डँग्लर्स नावाचा एक तरुण एडमंडच्या हाताखाली होता. तो नेहमी एडमंडचा द्वेष करायचा. वरच्या कथेत उल्लेखलेले निनावी पत्र तयार करण्यात त्याचाच मोठा वाटा होता. डाँटे तुरुंगात गेल्यावर त्याने नाना तऱ्हेच्या लटपटी करून पैसा मिळवून सावकारी करायला सुरुवात केली. एडमंड डाँटेने दुसऱ्या दोन शत्रूंचा नाश केल्यावर आपल्या हस्तकांकरवी डँग्लर्सला तो मोठी रक्कम घेऊन बँकेचे बाहेर पडताच धरले आणि एका खोलीत कोंडले.

---

"मला भूक लागली आहे." असे मी म्हणताच एक रक्षक पुढे आला. "बोला काय हवे?" असे त्याने विचारताच मी म्हटले, "एक कोंबडी." जरा वेळाने तो सुंदर शिजवलेली कोंबडी घेऊन आला. मी तुकडा तोडणार तोच तो म्हणाला, "आम्ही आगाऊ पैसे घेत असतो." मी त्याच्यापुढे एक किंमती नाणे फेकले. तो शांतपणे म्हणाला, "या कोंबडीची किंमत दहा हजार फ्रँक्स् ..." मी रागावून कोंबडी दूर केली. रक्षकाने कोंबडी उचलून नेली. अर्ध्यापाऊण तासाने मी साधा पाव मागितला. तीच किंमत सांगितली गेली. अखेरीस तेवढी किंमत मोजून मी कोंबडी मागवली.

... दुसऱ्या दिवशी अशीच भरमसाट किंमत देऊन मी खाद्यपदार्थ घेतले. " मला मारून तरी टाका असे हालहाल करण्यापेक्षा ! " असे मी म्हणताच उत्तर मिळाले, " आमच्या धन्याचा तसा हुकूम नाही. "

" मग अशा पद्धतीने माझ्याजवळील सर्व पैसे तुम्हाला दिल्यावर मी काय करू ? " असे मी तळमळून विचारताच मला जे उत्तर मिळाले त्यापेक्षा तोंडावर चाबकाचा फटकारा बसला असता तरी शतपटीने बरे झाले असते ... ते उत्तर होते, " नंतर भुकेने तडफडत बसा ! " मी रडू लागलो. कधी नव्हे तो परमेश्वराची करुणा भाकू लागलो. तसे करताना भुकेने मरणारा एक वृद्ध डोळ्यांसमोर दिसू लागला.

पाचव्या दिवशी मी काकुळतीला येऊन रक्षकाला म्हटले, " या यातना सहन होत नाहीत आता. "

रक्षक म्हणाला, " पण असेही काही लोक होते की जे तुमच्या करणीने भाकरी भाकरी करीत मरण पावले. "

" कबूल ! कबूल ! पण त्याबद्दल मला आता पश्चात्ताप होत आहे. " असे मी म्हणताच माझ्या परिचयाचा एक सरदार पुढे आला. मी उद्गारलो, " सरदार मॉंटे क्रिस्टो. "

" नाही...या नावाच्याही आधीचे माझे नाव तुझ्या परिचयाचे आहे. एडमंड डॉंटे ...

मी किंकाळीच मारली आणि त्याच्या पायाशी लोळण घेतली. डॉंटे गंभीरपणे म्हणाला, " ऊठ. तुला अभय आहे. पोटभर जेव. "

जेवल्यानंतर मला काळोखाच्या रस्त्यावर सोडण्यात आले. सकाळी जेव्हा मी एका ओढ्यावर पाणी प्यायला गेलो तेव्हा त्यात डोकावले. माझे सर्व केस पांढरे शुभ्र झाले होते.

■ ■

# २१. आपुले मरण पाहिले म्या डोळा

डयूमासचा ऐतिहासिक कादंबरीलेखनातला स्फूर्तिदाता होता ... सर वॉल्टर स्कॉट. स्कॉटची 'एव्हॅनो' ही कादंबरी फार प्रसिद्ध आहे. इंग्लंडमधील मूळ रहिवासी सॅक्सनांचा नॉर्मन लोकांनी पराभव करून तेथे आपली सत्ता प्रस्थापित केली होती. हे सेड्रीक नावाच्या वृद्ध सॅक्सन सरदाराला सहन झाले नाही. त्याने आपली पाल्य रोवेना या राजकुलोत्पन्न तरुणीचा विवाह ॲथलेस्टन या दुसऱ्या राजकुलातील तरुणाशी लावून द्यायचे ठरविले. अशाने दोन्ही घराणी एक होऊन नॉर्मनांचा पराभव करतील असा त्याचा विचार होता. पण स्वतः रोवेनाचे मात्र आळशी ॲथलेस्टनऐवजी सेड्रीकच्या मुलावर इव्हॅनोवरच प्रेम जडलेले असते. सेड्रीक इव्हॅनोला घरातून हाकलून देतो ... पुढे सेड्रीक, ॲथलेस्टन, रोवेना सारेच लुटारू नॉर्मन सरदारांच्या तावडीत सापडतात. त्यातून त्यांना सोडविण्यासाठी झालेल्या लढाईत अथॅलेस्टन वार लागून पडतो ... त्याला रीतसर कबरस्तानात ठेवले जाते व रीतीप्रमाणे त्याच्या स्मृतीप्रीत्यर्थ भोजनाचा कार्यक्रम आखण्यात येतो. पण तेवढ्यात स्वतः ॲथलेस्टनच तेथे येतो ...

माझ्या मरणाप्रीत्यर्थ दिल्या जाणाऱ्या मेजवानीस मीच स्वतः उपस्थित झालेला पाहून सर्वांची तारांबळ उडाली. मी त्यांना धीर देत म्हटले ... " घाबरू नका. तो मीच आहे. माझे भूत नाही. शत्रूच्या सरदाराने माझ्यावर सोटा हाणला खरा. पण माझ्या डोक्यावरील जिरेटोपामुळे माझे डोके बचावले. मी बेशुद्ध पडलो. आणि तुम्ही ऱ्यांनी मला मेल्यातच जमा केलेत ... आणि मला जेव्हा शुद्ध आली

तेव्हा मी शवपेटीत आहे असे आढळून आले. मी मोठ्याने गुरगुरलो तेव्हा पेटीच्या रक्षणासाठी ठेवलेले दोन पाद्री धावत आले व मला जिवंत पाहून चकितच झाले. आणि बरेचसे खट्टूही झाले. कारण त्यांचा डोळा होता, माझ्या मृत्यूप्रीत्यर्थ दिल्या जाणाऱ्या चमचमीत भोजनावर ... मी त्यांच्याजवळ मद्य मागितले. त्यांनी त्यात गुंगीचे औषध टाकले. आणि मला गाढ झोप लागताच त्यांनी माझे हातपाय बांधून टाकले. मी पुनः शुद्धीवर येताच त्या लबाडांनी पावाचा अवघा एक तुकडा मला खाऊ घातला ... मंडळी ... या खाण्यापिण्याच्या बाबतीत अत्यंत दक्ष असलेल्या ॲथलेस्टनला त्या नीचांनी अवघा एक पावाचा तुकडा दिला."

"मग ... तुझी सुटका तरी कशी झाली ? त्या दोघांचा हृदय-पालट होऊन त्यांनी तुला सोडले की काय !" एकाने मला प्रश्न केला.

मी चवताळून म्हणालो, "त्या दुष्टांना हृदयच नाही, तर त्याचा पालट कोठून होणार ? दारूच्या धुंदीत एकजण शवपेटी नीट लावायला विसरला आणि त्या गोष्टीचा फायदा घेऊन मी पळालो."

"जरा थांब ... थोडीशी पोटपूजा करा व मग तुमची कहाणी पुढे सांगा," असे एकाने सुचवले.

मी त्या सूचनेबद्दल कृतज्ञता दाखवीत म्हटले, "एक प्यालाभर मद्य तूर्त पुरे. कारण त्या दोघा दुष्टांना यथेच्छ कुबलून मी घोड्यावर स्वार झालो व तडक या किल्ल्यापाशी आलो. पहारेकरी मला अडवू लागला. मी त्याला म्हटले, "मी बहुरूपी असून लोकांची गंमत करावी म्हणून तुझ्या मृत धन्याचा वेष धारण केला आहे." तेव्हा त्याने मला आत सोडले. प्रथम मी आईची गाठ घेतली. भरपूर खाल्ले आणि मगच या ठिकाणी प्रवेश केला आहे."

यावर माझे पालक सेड्रीक म्हणाले, " बरे झाले, आता मला हुरूप आला आहे. आपला देश या नॉर्मनांच्या तावडीतून सोडवूच सोडवू. "

मी मान हलवीत म्हटले, " काकासाहेब ! मी कबरस्तानातून मुक्त झालो हेच डोक्यावरून पाणी गेले. आता आधी मी त्या दुष्ट जोगड्याला फाशी देणार. "

माझी आई म्हणाली, " अरे पण, त्याचा दर्जा किती मोठा आहे याची जरा जाणीव ठेवशील की नाही ? "

मी उसळून म्हणालो, " मला त्याने तीन दिवसांचा कडकडीत उपास घातला याची जाणीव कोणी ठेवायची ! " असे म्हणत मी रोवेनाला म्हटले, "तुझे माझ्यावर मुळीच प्रेम नाही, हे मी जाणून आहे. इव्हॅनोशी लग्न कर आणि सुखी हो ! मंडळी . . . आता वाट कसली पाहता ? भोजन तयार आहे . . . त्याचा समाचार घ्या पाहू. "

■ ■

# २२ आणखी भाकरी

चार्लस् डिकन्स या आंग्ल कादंबरीकाराने ' ऑलिव्हर ट्विस्ट ' या नावाची एक कादंबरी लिहिली आहे. मराठीत त्या कादंबरीचे ' अनाथ माधव ' या नावाने रूपांतर झाले आहे. या कथेचा नायक 'माधव' हा चांगल्या घराण्यातला दहा वर्षांचा मुलगा दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडून एका अनाथालयात वाढला. अनाथालयाला जरी भरपूर देणग्या मिळत तरी तेथे राहणाऱ्या मुलांची आबाळच होई. कारण अनाथालयाचे

चालक बराचसा पैसा स्वतःच खाऊन टाकीत. आश्रमातील सर्व नोक-रांच्या प्रमुखाचे नाव गोंदुकाका असे होते.

एकदा त्या अनाथालयात गणपत नावाच्या बारा वर्षांच्या मुलाचा प्रवेश झाला. तो फारच आडदांड होता. तो मुलांना धमकावीत असे की, ''मला येथली उपासमार सहन होत नाही. पाहीन पाहीन आणि टाकीन तुमच्यापैकी कोणालातरी खाऊन.'' मुले घाबरून जात.

---

एकदा मनाचा हिय्या करून सारी लहानमोठी मुले मला म्हणाली, ''माधवा ! तू पुढाकार घे आणि आपल्या व्यवस्थापकांना आपणा सर्वांना भरपूर खाऊ घालायला सांग.'' मी दचकलो. आमच्यासारख्या अनाथ मुलांनी गोंदुकाकांसारख्या कडक माणसाला असे काही सांगणे आणि उंदरांनी मांजराच्या गळयात घंटा बांधणे सारखेच होते. पण मी तेही धाडस करायचे ठरविले.

नेहमीचे तुटकेमुटके जेवण संपले तरी आम्ही पानावर बसूनच राहिलो. वाढप्याला मोठे नवल वाटले. त्याने लागलीच अधिकाऱ्यांच्या कानावर ही भयंकर गोष्ट घातली. व्यवस्थापक गडबडले. त्यांनी गोंदु-काकांवर ही भानगड सोपविली. त्या आश्रमाला अंदमानची उपमा दिली तर गोंदुकाकांना बारीबाबाचीच उपमा दिल्याशिवाय गत्यंतर नाही.

गोंदूकाका हातात छडी घेऊनच आले. ''तुमची जे णे झाली का नाही ?'' अशा कर्कश आवाजात गोंदूकाकांनी विचारलेला प्रश्न ऐकताच तेक मुले भेदरून पळूनच गेली. आम्ही पाटावर दोन-तीनच मुले उरलो होतो. मी या पुंडाव्याचा म्होरक्या आहे, हे गोंदूकाकांना कधीच समजले होते. ते गरजले, ''काय रे पोरट्या ! जेवण झाले आहे ना तुझे ? मग पानावर कशासाठी बसून राहिला आहेस ? ऊठ.''

" गोंदूकाका ! " मी डोळ्यांत पाणी आणीत म्हणालो, " एवढ्याने नाही हो आमचे पोट भरत... "

" अच्छा ! अजून साहेबांची भूक उरली आहे वाटते ? "

" अर्धी भाकर व मूठभर भात तरी नक्कीच जाईल मला. "

गणपत मला दुजोरा देत म्हणाला, " माधव म्हणतो तितके तरी वाला हो. " गोंदूकाकांनी हातातल्या छडीने आम्हा दोघांच्या पाठीवर फटकारे मारीत म्हटले, " भरले ना पोट ? का आणखी भाकर हवी आहे ? "

मी तो मार सहन करूनही गोंदूकाकांना म्हटले, " काका — काका, आमच्यावर दया करा....एक वेळ फाटके तुटके कपडे घालायला द्या; पण पोटावर मारू नका हो. "

पण गोंदूकाकांच्या हृदयाला मुळीच पाझर फुटला नाही. तेव्हा गणू आणि बाकीची मुलेही तेथून माना खाली घालून निघून गेली. मी मात्र तसाच उभा राहिलो. संतापाच्या भरात त्यांनी मला बेदम पिटले व एका अंधारकोठडीत कोंडून टाकले.

त्या तशाही स्थितीत मला बरे वाटले. कारण त्या कोठडीत असेपर्यंत तरी माराची भीती नव्हती.

अखेरीस आश्रमाचे सारे पंच गोळा झाले व मला त्यांनी आश्रमातून हाकलून द्यायचा निर्णय घेतला.

( ' Oliver Twist has asked for more ' )

■ ■

# २३. आम्ही वाचलो सात

---

९ मार्च १९४२ ची मध्यरात्र व्हायला थोडा अवकाश होता. 'रुजबूम' या जहाजावरील डेकवर वॉल्टर गिब्सन झोपी गेला होता. बोटीला पाण-सुरुंग लागला आणि जीव वाचविण्यासाठी प्रत्येकाने धडाधड बुडत्या बोटीतून समुद्रात उड्या घ्यायला सुरवात केली. गिब्सननेही उडी घेतली आणि एका फळकुटाचा आश्रय घेतला. लवकरच त्याच्यासह अनेकांनी एका संरक्षक होडीत प्रवेश मिळविला. ती होडी किनाऱ्याला लागायला बरोबर सव्वीस दिवस लागले. त्या सव्वीस दिवसांत ती होडी म्हणजे साक्षात नरक झाली होती. अठ्ठावीस लोक बसावेत अशा कल्पनेने बांधलेल्या त्या होडीत या क्षणी ऐंशी जणांनी दाटी केली होती. प्रथमचे एक दोन दिवस सर्वजण शिस्तीत वागले. जे काही खाद्यपदार्थ व पाणी ते बरोबर घेऊ शकले होते त्याचे वाटप करण्यात आले. प्रत्येकाला दररोज सकाळी चहाचा चमचा भरून पाणी व गोठवलेल्या दुधाचा एक चमचा ... असे प्रमाण ठरविण्यात आले. समुद्राचे पाणी प्यायचे नाही, अशा सक्त आज्ञा देण्यात आल्या होत्या.

---

पण लवकरच सारी शिस्त कोलमडू लागली. पाच जणांनी एक गट केला व रात्रीच्या वेळी एक एक करून प्रवाशांपैकी अनेकांना त्यांनी कोणाच्या न कळत जलसमाधी द्यायला सुरुवात केली. आमच्यापैकी अनेकांच्या लक्षात कालांतराने ही गोष्ट आली खरी. पण अन्नात तेवढेच भागीदार कमी झाले अशा कल्पनेने प्रत्येकजण या हिडीस प्रकाराकडे कानाडोळाच करीत होता. अनेकांना वेड लागले आणि त्या भरात त्यांनी समुद्रात उड्या ठोकल्या. मी इतर पंधरा जणांच्या मदतीने त्या

पाजी पंचकडीचा निकाल लावला. आणि तहानभुकेच्या तीव्रतेला तोंड देत देत मी, डोरीस लॅम ही महिला, एक सैनिक आणि चार जावानीज खलाशी असे फक्त सातजण सुमात्रापासून साठ मैलांवर असलेल्या सिपोरा नावाच्या ठिकाणी उतरलो. तेव्हा आमची बोट बुडून सव्वीस दिवस झाले होते.

मी जेव्हा आरशात बघितले तेव्हा मला त्यात भारतीय फकिरासारखा लांब दाढी वाढलेला, काळाकुट्ट असा एक रानटी चेहरा दिसला ... आणि शरीर ? त्यावर चिमूटभरसुद्धा मांस नव्हते उरलेले ... जणू तो मी नव्हतोच, तर आगीतून वाचविलेला एक पिवळटलेला हाडाचा सांपळाच होता तो.

मी तो आरसा खाली ठेवला आणि डोरीस लॅमकडे पाहिले ... तिने स्मितहास्य केले ... तहान-भूक-समुद्र-मानवरूपी राक्षस आणि साक्षात मृत्यू ... या सर्वांवर मात करून आम्ही वाचलो होतो ... हाच एक मोठा चमत्कार होता.

■ ■

## २४. दसऱ्याचे भोजन पदरात पडले

'बेइमान झालो खराखुरा। मी देशाचा अपराधी खरा' हे नगरच्या किल्ल्याची व्यथा सांगणारे गीत तुम्ही अनेकदा ऐकले असेल. पोटाची वीतभर खळगी भरण्यासाठी माणसांना प्रसंगी परक्यांची चाकरीही पत्करावी लागते आणि त्यातल्या काहींना तर आपल्याच राष्ट्रपुरुषांवर टेहळणी ठेवण्याचे कुकर्मही करावे लागते. लो. टिळकांवर

तर सतत सी. आय. डी. चा पहारा असे. या पहारेकऱ्यांच्या बाब-तीत खूपच गंमती घडत. ' बापट कमिशन 'साठी लोकमान्य बडोद्याला गेले असताही गुप्तचरांचा ससेमिरा चुकला नव्हता. तेथे ते एकदा एका गृहस्थाला भेटायला गेले असता गुप्तचर बाहेर तिष्ठत बसला होता. काम आटोपून लोकमान्य बाहेर येऊन पाहातात तो शासनाच्या या 'चक्षू'लाच डोळा लागलेला. तेव्हा त्यास हलवून जागे करीत लोकमान्य म्हणाले, " बाबा ! ऊठ. मी निघालो. चालू लाग. नाही तर तुझ्या नोकरीवर पाणी पडेल. " पुण्यात तर काय टिळकांच्या वाड्यावर गुप्तचरांचा चोवीस तास पहारा ... असाच एक गुप्तचर आपला अनुभव सांगत आहे.

---

दसऱ्याचा दिवस होता. बाराचा सुमार. मी टिळक महाराजांच्या वाड्यासमोर थांबून आत जाणाऱ्यांची नावे टिपून ठेवीत होतो. लोक-मान्य बाहेरून आले व माझ्यापुढे थांबून म्हणाले, " तू तर अगदी भुकेलेला दिसतोस. आता असे कर...वरी जा व जेवून ये. तू येईपर्यंत मी बाहेर जाणार नाही. "

मला मोठा आनंद झाला. मी खरोखरच भुकेने व्याकूळ झालो होतो या सत्पुरुषाच्या कृपेने मला आजच्या सणाचे दिवशी घरच्या लोकांचेसमवेत भोजन करता येणार होते. मी घाईघाईने घरी गेलो. सर्वजण मला अवचित आलेला पाहून चकितच झाले. पण त्यांना खरी गोष्ट सांगायचीही चोरीच होती.

काही तरी सांगून वेळ मारून नेली. भोजन केले. थोडीशी विश्रांती घेतली व जायला निघणार तोच एकदोघे ओळखीचे लो आले. नः पंचाईत झाली माझी. मी जायला निघावे तर त्यांनी म्हणावे, " बसा हो ! ड्यूटीला तर नाही ना जायचे. " साडेतीन

वाजेपर्यंत थांबलो. मग मात्र निर्धाराने उठलोच. टिळक महाराजांच्या वाड्यापर्यंत पोचायला चार वाजले. ते माझी वाट पाहातच होते. कारण दोन वाजताच त्यांना काही निकडीच्या कामासाठीं बाहेरचे बोलावणे आले होते. पण केवळ माझ्यामुळे त्यांना वाड्यातून हलता येईना. मी आल्यावर ते म्हणाले, " सुटलो रे बुवा तुझ्या वचनातून ! " आणि ते वाड्याबाहेर पडले.

■ ■

## २५. मला सात भाचरे आहेत

ला ब्रिये गावात जीन व्हॅल्जिन नावाचा पंचवीस वर्षांचा एक तरुण राहात होता. फार लहानपणीच तो आईवडिलांना मुकला होता. त्याच्या थोरल्या बहिणीला सात मुले होती. आणि तिचा पतीही नुकताच वारला होता. जीन व्हॅल्जिन मर मर काम करी आणि आपल्या या मोठ्या कुटुंबाचे मोठ्या कष्टाने पालनपोषण करी. पण त्याची बहीण शिजवलेल्या अन्नातला चांगलाचुंगला भाग आपल्या मुलांसाठी काढून ठेवी व जीन व्हॅल्जिनच्या वाट्याला करपटलेले कच्चेमच्चे पदार्थ येत. पण मोठ्या उदार मनाने जीन व्हॅल्जिन तिकडे दुर्लक्ष करी. एका हिवाळ्यात मात्र अशी परिस्थिती उद्भवली की, घरात अन्नाचा कण म्हणून शिल्लक उरला नाही. जीन व्हॅल्जिनला कोठे कामही मिळाले नव्हते....

काम करायची तयारी असूनही मला काम मिळत नव्हते. घरात अन्नाचा कण शिल्लक नव्हता. आणि माझी सात भाचरे तर भूक भूक म्हणून नुसता आक्रोश करीत होती....

रविवार – हो रविवारच होता त्या दिवशी...रात्र होताच मी घरातून निघालो तो तडक मॉबर्ट इसाबो या रोटीवाल्याच्या बंद दुकानापाशी आलो आणि एका बुक्कीसरशी त्या दुकानाच्या खिडकीची काच फोडून आतला पावाचा मोठा तुकडा उचलला आणि जीव घेऊन घराकडे पळत सुटलो. पण रोटीवाल्याने माझा पाठलाग करून धरलेच मला...आणि न्यायालयाने मला शिक्षा ठोठावली. "पाच वर्षे सक्त-मजुरी..."

त्या पाच वर्षांत मी पळून जायचा प्रयत्न केला म्हणून माझ्या शिक्षेत वाढ झाली. आणि या प्रकाराची पुनरावृत्ती होता होता अखेरीस मी १८१५ च्या ऑक्टोबरमध्ये सुटलो...

पण सुटलो तरी सर्वत्र माझ्या नावाचा पुकारा आधीच झालेला होता. एका मोठ्या शहरात मी प्रवेश केला तेव्हा भुकेने अगदी वखवखून गेलो होतो ... पण ज्या ज्या खानावळीत मी जाई तेथून तेथून मला हाकलून दिले जाई. कारण मी सांगितलेले पदार्थ वाढपी माझ्या टेबलापाशी आणीपर्यंत कोणीतरी शिष्ट माणूस खानावळ-वाल्याच्या कानी लागून म्हणे, "अहो शेठजी! हा भयंकर माणूस आहे!"

सरतेशेवटी हिंडता हिंडता मी तुरुंगाच्या दाराशी गेलो. आणि तुरुंगाधिकाऱ्याला कळवळून म्हटले, "महाराज! आजच्या रात्रीपुरता आश्रय व अन्न द्याल का मला?" त्याने उत्तर दिले, "तुरुंग म्हणजे खानावळ नव्हे. काहीतरी गुन्हा करून कैदी हो ... तुरुंग तुझ्या स्वागताला सिद्धच आहे ..."

शेवटी एका घरापाशी आलो. साऱ्या प्रकाराची पुनरावृत्ती झाली. घरमालक म्हणाला, "चले जाव." मी गयावया करीत म्हटले,

" निदान पेलाभर पाणी तरी द्या मला." मला उत्तर मिळाले, " बंदुकीची गोळी मिळेल."

अन्न नाही तर नाही; निदान या कडाक्याच्या थंडीत निवारा तरी मिळायलाच हवा होता. मी एका झोपडीपाशी आलो. रस्ता दुरुस्त करणारे लोक बांधतात त्या स्वरूपाची ती झोपडी होती. तिचे दार अगदीच निरुंद व ठेंगणे होते. अशी घरे रात्रीच्या वेळी सहसा रिकामीच असतात. मी त्या झोपडीत प्रवेश केला. तेथे गवत पसरलेले होतेच. मी तात्काळ त्या बिछान्यावर अंगच टाकले. पण क्षणार्धातच मला एका धिप्पाड व बळकट कुत्र्याची गुरगुर ऐकू आली. ही झोपडी म्हणजेच त्याचे घर होते. माझ्या गाठोड्याचा ढालीसारखा उपयोग करीत व हातातली काठी परजवीतच मी बाहेर पडलो ... कुंपणाबाहेर पडून एका दगडावर बसत मी कळवळून म्हटले, " अरे देवा ! तू माझे जे हाल चालवले आहेस त्यांना कुतरओढीपेक्षाही भयंकर नाव शोधावे लागेल आता ! "

पण अखेरीस मला एका धर्मगुरूने आसरा तर दिलाच पण माझ्या लक्तरांची घृ न धरता स्वतःबरोबरच जेवू पण घातले...त्या धर्मगुरूचे नाव होते एम् मिरियल

■ ■

## २६. जलपान ! छे अमृतपान !*

बंगाल्यात भयंकर दुष्काळ पडला होता. गावेच्या गावे ओस पडली होती. पदचिह्न गावचे जमीनदार महेंद्र आपली पत्नी कल्याणी व लहान

* 'आनंदमठ' बंकिमचंद्र

मुलगी यांना घेऊन मोठ्या शहराकडे निघाले. वाटेत पत्नीला व मुलीला थांबवून महेंद्र दुधाच्या शोधार्थ गेले तो लुटारूंनी कल्याणीला व तिच्या मुलीला पळवून नेले. भुकेने वखवखलेल्या त्या लुटारूंनी या दोघींचेच भक्ष्य करायचा विचार चालवला आणि त्यांच्या आपापसात कटकटी सुरू झाल्या. ती संधी साधून कल्याणी मुलीला घेऊन पळाली. पळता पळता ती एका झाडाखाली विसावली; आणि देवाचा धावा करू लागली, तोच तिच्या कानावर शब्द पडले, " हरे मुरारे मधु कैटभारे। गोपाल गोविंद मुकुंद शौरे।"

हळूहळू आवाज जवळ येऊ लागला आणि शेवटी तिच्यापुढे एका शुभ्रवस्त्रधारी साधूची मूर्ती उभी राहिली...कल्याणीने कसाबसा त्या मुनींना प्रणाम केला आणि ती मूर्छा येऊन पडली.

---

त्या बेशुद्ध पडलेल्या स्त्रीला व तिच्या मुलीला घेऊन मी माझ्या मठात नेले व तिला शुद्धीवर आणले. मी तिच्या पुढे दूध केले व म्हटले, ' हे देऊळ आहे. तू निर्धास्त राहा. थोडे दूध मुलीला दे. थोडे तू घे."
तिने मुलीला दूध पाजले. पण स्वतः मात्र प्यायली नाही. मी तिला म्हटले, " मुली, तूही घे ना दूध."

हात जोडून ती म्हणाली, " महाराज! क्षमा करा. आपली आज्ञा पाळण्यात एक मोठे धर्मसंकट आहे. म्हणून मी दूध पीत नाही."

मी म्हटले, " मुली ... तू माझ्या कन्येसारखी ... काही खाल्ले-प्यायले नाहीस तर जगशील कशी?"

तिने सद्‌गदित कंठाने म्हटले, " आपण तर मला देवाच्या ठिकाणी आहात. आपणापासून का लपवून ठेवू? माझे पतिदेव अजून-पर्यंत भुकेलेलेच असतील. त्यांचे दर्शन घेतल्याशिवाय आणि त्यांना वाढल्याशिवाय मला कसे बरे दूध पिता येईल?"

हळूहळू मी तिची हकीकत विचारून घेतली. व मग म्हटले, "मी जातो महेंद्राच्या शोधाला. पण तू आधी दूध घे. नाही तर नाही



जाणार मी." ती म्हणाली, "मला थोडेसे पाणी मिळेल का" मी तिला माठ दाखविला. त्यातले ओंजळभर पाणी घेऊन तिने ते माझ्या पायात बुडवून ते प्राशन केले व म्हटले, "मी अमृत प्यायले आहे. आता आपण मला खाण्यापिण्याचा आणखी आग्रह करू नये. पति-देवांचा शोध लागल्याविना मी आता काही घेणार नाही."

■ ■

## २७. मला न्याय मिळाला

माझ्या कपाळावर चंद्रकोरीच्या आकाराचा पांढरा ठिपका होता, म्हणून माझ्या धन्याने माझे मोठ्या प्रेमाने 'चाँद' असे नाव ठेवले होते. कितीतरी लढायांत तो माझ्यावर स्वार झाला होता. कितीतरी रान-डुकरांच्या शिकारी त्याने माझ्या पाठीवर बसूनच केल्या. पण या प्रेमळ धन्याचा सहवास मला दीर्घ काळ लाभला नाही. एका लढाईत झालेली जखम विषारी बनली व त्या दुखण्यातच त्याचा अंत झाला.

त्या माझ्या धन्याचा मुलगा फारच लहान असल्याने सारा कारभार धन्याचा धाकटा भाऊ पाहू लागला. माझा धनी आणि हा त्याचा भाऊ यात जमीनअस्मानाचे अंतर होते. तो शूर होता तर हा भेकड होता. तो निर्व्यसनी होता तर हा सतत दारूच्या धुंदीत असायचा. त्याने माझ्या धन्याच्या वेळचे म्हातारे व अनुभवी नोकर काढून टाकले व त्या जागी बदमाष-गुंडांचा भरणा केला. नंतर त्याने एक एक करून पागेतली घोडीही विकून टाकली. हा वेळपर्यंत मीही थकलो होतो. मला लवकर गिऱ्हाईक मिळेना, तेव्हा तो चिडला व माझ्या पाठीवर चाबकाचे दोन फटकारे ओढून त्याने मला पागेतून हाकलून दिले.

दोन-चार दिवस मी कशीबशी गुजराण केली स्वतःची, पण पाचव्या दिवशी मात्र सारे उपाय हरले. रात्रीची वेळ होती. मी राज-वाड्यासमोरून चाललो होतो. त्या ठिकाणी दरवाजाबाहेर उंचावर एक मोठी घंटा टांगली असून तिला जमिनीपर्यंत पोचेल अशी साखळी लावण्यात येत असे. पण या वेळी मात्र साखळी मध्यावरच तुटली

असून ती खालपर्यंत पोचावी म्हणून कोणी तरी नोकराने गवताचाच वळलेला दोर त्या साखळीला बांधून ठेवला होता. मी मनात म्हटले, 'गवत तर छान दिसतेय, या न्यायशृंखलेला! तेच खाऊन दोन दिवसांच्या उपासाचे पारणे फेडावे हे बरे.'

मी जवळ गेलो आणि ती दोरी ओढू लागलो. पण दोरी तर पक्की बांधलेली होती. माझ्या ओढाताणीत त्या दोरीला बांधलेली घंटा मात्र जोरजोरात वाजू लागली. तो नाद ऐकताच तो राजवाडा तर जागा झालाच पण स्वतः राजेसाहेबही जागे होऊन तेथे आले.

"कोणी वाजवली घंटा? कोणाची तक्रार आहे?" असे त्यांनी विचारताच पहारेकरी म्हणाला, "सरकार! कोणाची काही तक्रार नाही. एका मरतुकड्या घोड्याने गवताच्या आशेने दोरी ओढली एवढेच."

त्यावर राजेसाहेब म्हणाले, "ही न्याय-घंटा केवळ माणसांच्या तक्रारीसाठी आहे असे नाही. माझ्या राज्यातील मुक्या जनावरांना सुद्धा न्याय मिळाला पाहिजे. हा घोडा आमच्या ओळखीचा आहे. कारण याच्या माजी धन्याने अनेकदा याच्यावर बसून आमच्याबरोबर लढाईत भाग घेतला आहे. बोलवा पाहू याच्या सध्याच्या धन्याला."

लागलीच माझ्या दुष्ट धन्याला बोलावणे गेले. तो आला. मला वाऱ्यावर सोडले म्हणून राजेसाहेबांनी त्याची चांगलीच कानउघाडणी केली व म्हटले, "घेऊन जा या चाँदला पुनः आपल्या घरी."

तो पुढे झाला. पण मीच जागचा हलायला तयार नव्हतो. राजेसाहेब हसले व म्हणाले," चाँदला हा धनी बिलकुल आवडत नाही असे दिसते. ठीक आहे, चाँदला माझ्या पागेत नेऊन बांधा आणि या सरदाराकडून दर महिन्याला चाँदसाठी लागणारा खर्च वसूल करीत चला."

हे ऐकतांच मी मोठ्या आनंदाने खिंकाळलो. राजेसाहेबांनी माझी पाठ थोपटली व पागेत नेऊन स्वतःच्या हाताने हरळी खाऊ घातली.

■ ■

# २८. मी पहाऱ्यावर आहे !

---

सर्वांत कठीण कर्तव्य आहे द्वारपालाचे. लक्ष्मणासारख्या निग्रही पुरुषाला सुद्धा ते काम करताना दोनदा अपयश पत्करावे लागले आहे. पार्वतीच्या मानसपुत्राला द्वारपालाचे कर्तव्य बजावताना स्वतःचे शिर गमवावे लागले आहे. पाँपी शहरावर जेव्हा लाव्हा रसाचे लोटच्या लोट येऊ लागले तेव्हा बहुतेक नागरिक जिवाच्या भीतीने पळाले; पण अनेक द्वारपालांनी आपल्या जागा सोडल्या नाहीत, असे म्हणतात. त्या अग्निप्रलयानंतर कित्येक शतकांनी झालेल्या उत्खननात त्यांचे देह दाराशी उभे असलेल्या स्थितीतच सापडले.

इ. स. १७७७ चा हिवाळा. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध अगदी निकराला आले होते. वसाहतींच्या सैन्याची स्थिती पार बिघडली होती. सेनापती आपल्या फौजेसह फिलाडेल्फिया शहरापासून वीस मैलांवर असलेल्या फोर्ज खोऱ्यात होता. एकदा जेवण करून तो आपल्या राहत्या जागेतून बाहेर पडला, तो त्यास आपला पहारेकरी भुकेने अगदी कळवळून गेला आहे असे दिसले.

---

मी भुकेने व्याकूळ झालो होतो, तरी तसे तोंडावर दिसू नये याबद्दल आटोकाट प्रयत्न करीत होतो. पण आमच्या चाणाक्ष

सेनापतीसाहेबांच्या ती गोष्ट लागलीच लक्षात आलीच. ते मला म्हणाले, " जा माझ्या घरात आणि जेवण करून ये. "



मी नम्रपणे म्हणालो, " साहेब ! मला आपली ही आज्ञा पाळता येत नाही, याबद्दल क्षमा करा. "

ते चकित होऊन म्हणाले, " का बरे ? "

मी उत्तर दिले, " मी पहारा करीत आहे. तो मला कसा सोडता येईल ? "

त्यावर सेनापतीसाहेब हसून म्हणाले, " एवढेच ना ... दे तर तुझी बंदूक माझ्याकडे. तू जेवण करून येईपर्यंत मीच पहारा देत राहातो म्हणजे झाले. "

आणि खरोखरीच त्यांनी माझ्या हातातली बंदूक काढून घेतली व ते देवडीवर उभे राहिले. मी निमूटपणे आत गेलो व भोजनास सुरुवात केली.

■ ■

## २९. गीत कुणाचे व्यथा कुणाला

कविवर्य रवींद्रनाथ ठाकूर विलायतेला शिक्षणासाठी गेले होते त्यावेळची एक गोष्ट. काही कारणाने त्यांचा एका अँग्लोइंडियन स्त्रीशी परिचय झाला. या बाईच्या मृत पतीवर त्यांच्याच एका भारतीय नोकराने एक शोकगीत लिहून ते बिहाग रागात म्हणायचे अशी सूचनाही लिहून ठेवली होती. त्या बाई छोट्या रवींद्रांना ते गीत गायला आपल्या उपनगरातील घरी वेळी अवेळी बोलवीत असत. रविबाबू ते निमंत्रण अनेकदा चुकवीत असत. एकदा मात्र तारच आली. आणि रविबाबू त्या ठिकाणी जाण्यासाठी आगगाडीत बसले. पुस्तक वाचण्याच्या नादात

इच्छित ठिकाणी पोचून गाडी माघारी वळली तरी रविबाबूंचा बराच वेळ पत्ताच नव्हता ! चूक उमगल्यावर ते मधल्याच एका स्थानकावर उतरले, पण इच्छित स्थानकाला जायला गाडी मिळायला फार वेळ झाला ...

---

सकाळी दहा वाजता फराळ करून निघालो होतो. तेव्हापासून अद्यापपर्यंत पाण्याचा घोटही घेतला नव्हता. मला जावयाचे होते त्या स्थानकाकडे जाणारी दुसरी गाडी आली एकदाची. आणि मग मी यथावकाश त्या बाईच्या घरी पोचलो. फरक एवढाच की, संध्याकाळी सातला पोचण्याऐवजी रात्री नऊला पोचलो होतो. तोपर्यंत यजमानीण बाईच्या घरची जेवणे आटोपूनही गेलेली होती. माझी हकीकत ऐकल्यावर बाईंनी वाळलेली दोन बिस्किटे व उकळविलेल्या कडक चहाचा प्याला मला दिला.. नंतर. झाला नाच ... व मग बाईंनी बरोबर एक नोकर देऊन मला एक 'पथिकाश्रम' दाखविला ! तेथल्या व्यवस्थापकाला विचारले, " महाशय ! जे काय खाण्यायोग्य असेल ते आणा आता लवकर. " व्यवस्थापकांनी नन्नाचा पाढा वाचला आणि निजावयाची जागा दाखविली...त्या पथिकाश्रमाच्या एकंदर कीर्तीला साजेशीच ती जागा होती, एवढे सांगितले म्हणजे पुरे !

सकाळी बाईकडून निरोप आला, " फराळाला या. " मी मोठ्या उत्सुकतेने गेलो. सगळे पदार्थ थंडगार. आदल्या रात्रीच्या जेवणातले शिल्लक राहिलेले...मला राहून राहून वाटत होते की, हेच पदार्थ काल रात्री मला दिले असते तर काय मौज आली असती !

फराळ आटोपल्यावर यजमानीणबाईच्या आजारी मैत्रिणीला ते प्रसिद्ध शोकगीत म्हणून दाखवून मी परत लंडनला आलो आणि सपाटून आजारी पडलो.

■ ■

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.

वा. क्र. ९५८८ नों. दि. ..........

वि. वो.ग्री. क्र. ..........

IRBK-0114989